सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on


E-Mail : prajasattaknews24@gmail.com


RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३०२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ६ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६




सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३०२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ६ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## अग्निवीरांसाठी नवीन नियम! पर्मनंट सैनिक होण्यापूर्वी करता येणार नाही लग्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नागपूर**

येणाऱ्या दिवसात तुम्ही देखील अग्निवीर होण्यासाठी तयारी करत असाल तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. अग्निवीर योजनेअंतर्गत पर्मनंट सैनिक होण्याच्या नियमांमध्ये काही बदल करण्यात आले आहे. या नवीन नियमांनुसार आता अग्निवीर योजनेअंतर्गत भरती होणाऱ्या सैनिकांना पर्मनंट सैनिक होण्यापूर्वी लग्न करता येणार नाही. जर अग्निवीर या प्रक्रियेदरम्यान किंवा पर्मनंट सैनिक होण्यापूर्वी लग्न करत असेल तर त्यांना पर्मनंट सेवेसाठी अपात्र ठरवले जाईल. पर्मनंट होण्यापूर्वी लग्न करणाऱ्या सैनिकांना अग्निवीर पर्मनंट सेवेसाठी अर्ज करू शकणार नाहीत किंवा निवड प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार नाहीत.



नवीन नियमानुसार, अग्निवीर भारतीत सैन्यात पर्मनंट सैनिक म्हणून नियुक्त झाल्यानंतरच लग्न करु शकतात. त्यामुळे पर्मनंट नियुक्तीचे अंतिम निकाल येईपर्यंत त्यांना लग्नापासून दूर राहावे लागेल मात्र यासाठी जास्त वेळ लागणार नाही. चार वर्षांची सेवा पूर्ण केल्यानंतर, अग्निवीरांना पर्मनंट प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी सुमारे चार ते सहा महिने वाट पहावी लागेल.अग्निवीर योजना २०२२ मध्ये सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत भरती झालेली पहिली तुकडी आता त्यांची चार वर्षांची सेवा पूर्ण करत आहे. अग्निवीरांच्या २०२२ च्या तुकडीतील सेवा कालावधी जून आणि जुलै २०२६ च्या सुमारास संपेल असा अंदाज आहे. पहिल्या तुकडीमध्ये अंदाजे २०,००० तरुण होते, जे आता निवृत्त होत आहेत. या अग्निवीरांपैकी सुमारे २५ टक्के लोकांना भारतीय सैन्यात पर्मनंट सैनिक होण्याची संधी मिळेल.निवड शारीरिक तंदुरुस्ती, लेखी परीक्षा आणि इतर निकषांवर आधारित असेल. निवड प्रक्रिया पूर्णपणे गुणवत्ता आणि कामगिरीवर आधारित असेल. यशस्वी अग्निवीरांना सैन्यात कायमस्वरूपी सेवा दिली जाईल. सेवा पूर्ण झाल्यानंतर पर्मनंट सैनिक होण्याची प्रक्रिया लगेच पूर्ण होत नाही. अग्निवीरांना अर्ज करावा लागतो आणि त्यानंतर संपूर्ण निवड प्रक्रिया सुरू होईल. ही प्रक्रिया साधारणपणे ४ ते ६ महिने चालते. दरम्यान, अंतिम यादी जाहीर होईपर्यंत कोणत्याही अग्निवीराने लग्न करू नये असे लष्कराने स्पष्ट केले आहे.

तर दुसरीकडे लष्कराने असे म्हटले आहे की जर अग्निवीर या कालावधीत लग्न करत असेल तर त्यांना पर्मनंट सेवेच्या शर्यतीतून अपात्र ठरवले जाईल. अशा उमेदवाराचा अर्ज त्यांच्या पात्रतेकडे दुर्लक्ष करून स्वीकारला जाणार नाही. म्हणून, अग्निवीरांना हा नियम गांभीर्याने समजून घेण्याचा आणि त्याचे पालन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.पर्मनंट सैनिक म्हणून निवड झालेल्या अग्निवीरांना त्यांच्या नियुक्तीनंतर लग्न करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असेल. एकदा ते पर्मनंट सैन्यात सामील झाले की, ते त्यांच्या सोयीच्या आणि पसंतीच्या कोणत्याही वेळी लग्न करू शकतात. हे निर्बंध आता त्यांना लागू राहणार नाहीत.

## नव्या वर्षाचं गिफ्ट! मुंबई-पुणे प्रवास सुसाट, मुख्यमंत्र्यांनी दिले थेट आदेश

### मिसिंग लिंक १ मे २०२६ पासून सुरू होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.मुंबई**

मुंबई पुणे प्रवासातील वाहतूक कोंडीतून थोडासा दिलासा मिळणार आहे. कारण, १ मे २०२६ पासून मिसिंग लिंक पूर्णपणे खुला करण्यात येणार आहे. एमएसआरडीसीचे अधिकारी राजेश पाटील यांनी टाइम्स ऑफ इंडियाशी बोलताना मिसिंग लिंकच्या कामाबाबत माहिती दिली. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मिसिंग लिंक १ मे रोजी सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे ३० मिनिटांचा वेळ वाचणार आहे. लोणावळा-खोपोली परिसरातील घाटमार्गावर वाहनांचा वेग कमी होत असल्यामुळे प्रवासाचा वेळ वाढत होता. त्यावर उपाय म्हणून 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचा प्रारंभ केला.



मुंबई पुणे एक्सप्रेस वे वरील 'मिसिंग लिंक'चे काम मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मिसिंग लिंक सुरू झाल्यास वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. त्याशिवाय प्रवासाचा वेळही ३० मिनिटांनी कमी होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबई आणि पुणे या दोन शहरातील प्रवासाचा वेळ वाढला आहे. वाहनांची संख्या वाढल्यामुळे घाटामध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. त्यामुळे तास ते दीड तासांचा वेळ वाढला. पण आता मिसिंग लिंक सुरू झाल्यास मुंबई-पुणे प्रवासाचा वेळ ३० मिनिटांनी कमी होणार आहे.

मिसिंग लिंकच्या कामासोबतच अत्याधुनिक केबल स्टेड पुलाचे कामही अंतिम टप्प्यात आहे. पुलाच्या दोन टोकांना जोडण्याचे काम वेगाने पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला (एमएसआरडीसी) दिले आहेत. मार्च ते एप्रिल महिन्यात ही दोन्ही कामे पूर्ण होतील, असे अधिकाऱ्याने टाइम्स ऑफ इंडियाशी बोलताना सांगितले. दरम्यान, मिसिंग लिंक सुरू झाल्यास पुण्यातील गुंतवणूक वाढवण्यास याचा लाभ होईल, असे उद्योग जगतामधील विश्लेषकांचे मत आहे.

## सावरकरांचे विचार मान्य असतील तर सोबत या : नाहीतर तुमच्याशिवाय पुढे जाऊ

### आशिष शेलारांनी अजित पवारांना ठणकावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६पुणे**

आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर महायुतीतील मित्रपक्षांमधील सख्य संपल्याचे चित्र दिसत आहे. राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी अजित पवार यांच्यावर सडकून टीका करत त्यांना सावरकरांच्या मुद्द्यावरून आरसा दाखवला आहे. तुम्हाला सावरकरांचे विचार मान्य असतील, तर तुमच्या बरोबर, नाहीतर तुमच्याविना आणि विरोधात शिरलात तर तुमच्या विरोधात आम्ही आमचे काम करू, अशा अत्यंत कडक शब्दांत शेलारांनी अजित पवारांना ठणकावले आहे.

भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचा उल्लेख केल्यानंतर अजित पवार यांनी टीका केली होती. या टीकेला उत्तर देताना आशिष शेलार यांनी उपरोक्त इशारा दिलेला आहे. ते म्हणाले, आमचा पक्ष स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांवर चालणारा आहे. रवींद्र चव्हाण म्हणालेच आहेत की आम्ही सावरकरांचे भक्त आहोत. सावरकरी विचारांवर चालणारे लोक आहोत. त्यामुळे अजित पवारांच्या पक्षाला सुद्धा सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील. याल तर तुमच्या बरोबर न याल तर तुमच्याविना आणि विरोधात शिरलात तर तुमच्या विरोधात आम्ही आमचे काम करु,



असा इशारा आशिष शेलार यांनी अजित पवारांना दिला. त्यामुळे महापालिका निवडणुकीच्या आधी भाजपा आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये जुंपण्याची शक्यता आहे.

मतदानाला अवघे १० दिवस उरले असताना महायुतीमधील हा कलह चव्हाट्यावर आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीमधील या वादामुळे महाविकास आघाडीला फायदा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मित्रपक्षांमधील या वाकयुद्धामुळे कार्यकर्त्यांमध्ये आणि मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## जिल्ह्याच्या विकासासाठी एकत्रितरित्या योगदान द्यावे -जिल्हाधिकारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

जिल्ह्यातील समस्या जाणून त्यावर विविध विभागातर्फे उपाययोजना करण्यात येत आहे. जिल्हा वॉर रूमच्या माध्यमातून प्राधान्याचे क्षेत्र निवडून त्यात विकास घडवून आणल्या जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पर्यटन आणि इतर क्षेत्राचा विकास करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितरित्या योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले. जिल्हा वॉर रूमची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आज घेण्यात आली. बैठकीत चिखलदरा पसिरातील पर्यटकांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा घेण्यात आला. वनविभागातर्फे करण्यात आलेल्या विविध कामांमुळे पर्यटक आकर्षित होण्यास मदत झाली आहे.

## बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांचे भविष्य ठरणार; निवडणूक आयोग घेणार मोठा निर्णय?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६मुंबई**

राज्यात महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरु असून या निवडणुकीत कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. २९ महापालिका निवडणुकीसाठी राज्यात १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे मात्र त्यापूर्वी ७० पेक्षा जास्त नगरसेवक राज्यात बिनविरोध निवडून आल्याने अनेक चर्चांना उधाण आले आहे. तसेच या प्रकरणात आता राज्य निवडणूक आयोगाने कारवाई करावी अशी मागणी देखील विरोधकांकडून करण्यात येत आहे.

कल्याण- डोंबिवली महापालिकेत तब्बल २० उमेदवार बिनविरोध निवडून आले आहे. या प्रकरणात मनसेने न्यायालयात याचिका देखील दाखल केली आहे. तर आता या प्रकरणात एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. ज्यामुळे बिनविरोधात निवडून आलेल्या उमेदवारांचे भविष्य ठरणार आहे.

सध्या या प्रकरणात समोर आलेल्या माहितीनुसार, बिनविरोध निवडणुकीची तरतूद कायद्यातच असून जर निवडणुकीत एकच उमेदवार असल्याच पुढे नोटा हा पर्याय देऊन निवडणुका घेण्याची तरतूद कायद्यात नाही असं राज्य निवडणूक आयोगाकडून सांगण्यात येत असल्याचा दावा काही मीडिया रिपोर्टमध्ये करण्यात येत आहे.नोटाचा पर्याय हा उमेदवार नसून निवडणूक झाल्यास निवडणुकीच्या रिंगणातील उमेदवारांना नाकरण्याचा पर्याय असल्याचेही राज्य निवडणूक आयोगाकडून सांगण्यात येत असल्याचा दावा करण्यात येत आहे.राज्यात तब्बल ७० पेक्षा जास्त नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याने राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले आहे. या प्रकरणावरुन राज्य निवडणूक आयोगावर जोरदार टीका देखील करण्यात येत आहे. तसेच आयोगाकडून या प्रकरणात हस्तक्षेप करण्यात यावा अशी मागणी देखील विरोधकांकडून करण्यात येत आहे. तर दुसरीकडे ज्या ठिकाणी बिनविरोध निवडणुका झाल्या आहे. त्याठिकाणी नोटाचा पर्याय देऊन निवडणूक घ्यावी अशी मागणी केली जात आहे.कल्याण-डोंबिवली महापालिकासह ठाणे, मुंबई, पुणे, अहिल्यानगरमध्ये उमेदवारांना धमकावून आणि त्यांच्यावर दबाब आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास भाग पाडण्यात आले असल्याचा आरोप विरोधी पक्षांकडून करण्यात येत असल्याने या प्रकरणात राज्य निवडणूक आयोग काय निर्णय घेणार याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून आहे.

## शरीफ है हम, किससे लड़ते नहीं, जमाना जानता है हम किसी के बाप से डरते नही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६पुणे**

शरीफ है हम, किससे लड़ते नहीं, जमाना जानता है हम किसी के बाप से डरते नहीं,' अशा शायरीमधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रचार सुरू आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीत माझा फोकस फक्त विकासावर आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. पुण्यातील जाहीर सभेत स्पष्ट केलं. यावेळी त्यांनी पुण्यातील भविष्यातील विकास आराखडा सादर केला.




या निवडणुकीत विरोधकांना पाणी पाजणार आहे, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. यावेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'पुणे हे केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्या आर्थिक विकासाचे इंजिन आहे. पुण्याची लोकसंख्या ज्या वेगाने वाढत आहे, त्याच वेगाने शहराच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. पुण्याच्या सर्वांगीण विकासासाठी ४४ हजार कोटी रुपयांचा सर्वसमावेशक आराखडा तयार आहे.

पुण्यातील जुन्या नियोजनावर टीका करताना फडणवीस म्हणाले की, पूर्वी केवळ ९ टक्के रस्ते निर्माण झाले, ज्यामुळे आज ३२ रस्त्यांवर शहराची ८० टक्के वाहतूक अवलंबून आहे. आता ही वाहतूक सुरळीत करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (-ख) तंत्रज्ञानाचा वापर करून वाहतूक नियोजनाचे काम केले जाईल. फडणवीस म्हणाले की, पुणे मेट्रोबाबत अनेक वर्षे केवळ चर्चा सुरू होती. मात्र, २०१५ आणि २०१७ मध्ये भाजपची सत्ता आल्यानंतर खऱ्या अर्थाने कामाला गती मिळाली. सध्या ३३ किलोमीटरचे नेटवर्क पूर्ण झाले असून, एकूण ११० किलोमीटरच्या मेट्रोचे नियोजन आहे.

शहरात दरवर्षी ३ ते ४ लाख वाहने वाढत आहेत. ही कोंडी फोडण्यासाठी मेट्रोसोबतच ४ हजार इलेक्ट्रिक बसेस रस्त्यावर उतरवल्या जातील. उत्तर आणि दक्षिण पुण्यातील अरुंद रस्त्यांवरील ताण कमी करण्यासाठी ५४ किलोमीटरच्या भुयारी मार्गांचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी ३२ हजार कोटी रुपयांची स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे, असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

पुणे हे जगातील सर्वोत्तम शहर बनवण्याचे आमचे स्वप्न आहे. पुणेकरांना शुद्ध पाणी देण्यासोबतच 'पाणी गळती' रोखण्याला आमचे सर्वोच्च प्राधान्य असेल. रस्ते, उड्डाणपूल आणि सांडपाणी व्यवस्थापनासाठी ४४ हजार कोटींचे प्रकल्प राबवले जात आहेत. पुण्याचा विकास हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर पुणेकरांचे जीवनमान सुसह्य करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आमचा विकास आराखडा तयार असून येणाऱ्या काळात पुण्याचा चेहरामोहरा बदललेला दिसेल, असा विश्वासही फडणवीसांनी यावेळी व्यक्त केला.

## रतन इंडियाविरोधात संतप्त कामगारांचा उद्रेक; रेल्वे रोखली, प्रकल्पाला घेराव;विवेक गुल्हाने यांची तब्येत खालावली

### आ. राजेश वानखडे यांनी दिली उपोषणाला भेट; वाघोली, डवरगाव येथील त्रस्त नागरिकही उपोषणस्थळी; पोलिसांचा तगडा बंदोबस्त, आंदोलन चिघळण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नांदगाव पेठ**

रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पातील कामगारांना न्याय मिळावा या मागणीसाठी सुरू असलेले आंदोलन मंगळवारी अत्यंत तीव्र वळणावर पोहोचले. संतप्त कार्यकर्त्यांनी थेट रतन इंडियाची रेल्वे रोखून धरत प्रकल्पाचे चारही प्रवेशद्वार बंद केले.पोलिसांचा चारही प्रवेशद्वारावर तगडा बंदोबस्त असून संपूर्ण परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी सुद्धा रतन इंडिया व्यवस्थापनाने कोणत्याही प्रकारची सकारात्मक चर्चा न केल्यामुळे आंदोलन कोणत्याही क्षणी चिघळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. उपोषणाचे नेतृत्व करणारे भाजप नेते विवेक गुल्हाने यांची प्रकृती आंदोलनादरम्यान खालावली. सातत्याने सुरू असलेल्या उपोषणामुळे त्यांना अशक्तपणा, चक्कर येणे आदी त्रास जाणवू लागल्याने कार्यकर्त्यांमध्ये संताप अधिकच वाढला. कामगारांच्या हक्कांसाठी आम्ही माघार घेणार नाही, असा ठाम इशारा यावेळी देण्यात आला.दरम्यान, आंदोलनस्थळी आ. राजेश वानखडे यांनी भेट देत उपोषणकर्त्यांना धीर दिला.त्यांनी रतन इंडिया व्यवस्थापनाच्या बेजबाबदार आणि कामगार विरोधी भूमिकेचा समाचार घेतला.विवेक गुल्हाने यांनी कामगारांच्या हक्कासाठी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा दर्शवत त्यांनी कामगारांच्या मागण्यांबाबत रतन इंडियाने तात्काळ निर्णय घ्यावा



अन्यथा भाजप अधिक तीव्र आंदोलन करेल असा इशाराही आ. राजेश वानखडे यांनी दिला. रतन इंडियाच्या एका शिष्टमंडळाने आ. राजेश वानखडे यांच्या उपस्थितीत विवेक गुल्हाने व अन्य उपोषणकर्त्यांची भेट घेतली व आंदोलन मागे घेण्याबाबत विंनती केली मात्र प्रकल्पप्रमुख यांनी लेखी आश्वासन देण्यावर उपोषणकर्ते ठाम राहले त्यामुळे आजची चर्चा निष्फळ ठरली असून आज सकाळपासून आ. राजेश वानखडे हे उपोषण मंडपात तळ ठोकून बसले होते.या आंदोलनाला परिसरातील वाघोली व डवरगाव येथील त्रस्त नागरिकांनीही पाठिंबा दर्शवत उपोषणस्थळी उपस्थिती लावली. स्थानिक नागरिकांच्या मते, प्रकल्पामुळे रोजगाराच्या नावाखाली आमच्या मुलांना अन्याय सहन करावा लागत असून दुसरीकडे वाघोली गावात रतन इंडियाच्या उडणाऱ्या राखेमुळे नागरिकांचे जीवन हैराण झाले असल्याचे त्यांनी सांगितले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तरीही परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप न केल्यास आंदोलन अधिक उग्र रूप धारण करू शकते, असा इशारा आंदोलनकर्त्यांकडून देण्यात येत आहे.कामगारांच्या हक्कांसाठी पेटलेला हा संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर आला असून, रतन इंडिया प्रशासन व शासनाची पुढील भूमिका काय असते याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**रेल्वे ठप्प, रतन इंडियाविरोधात संतापाचा उद्रेक**

रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाला कोळसा पुरवठा करणारी रेल्वे दिवसभर उभीच राहिल्याने कोळसा वाहतूक पूर्णतः ठप्प झाली.रेल्वे ठप्प असल्यामुळे रतन इंडियाला तासाला लाखो रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे.संतप्त कार्यकर्त्यांनी रेल्वे रुळांवर ठिय्या मांडत जोरदार नारेबाजी केली.प्रशासनाच्या भूमिकेविरोधात कार्यकर्त्यांनी तीव्र रोष व्यक्त करत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा भाजप तिवसा शहर अध्यक्ष अजय गुल्हाने,तालुका युवा मोर्चा अध्यक्ष विजय भुयार, तालुका सरचिटणीस ऋषिकेश चांगोले,किसान मोर्चा तालुका उपाध्यक्ष नितीन काळे, मिलिंद पाटील, आकाश गुल्हाने, अनिकेत बारोटकर, सचिन हटवार, प्रतीक नंदनवार यांनी दिला.

**आता माघार नाही – विवेक गुल्हाने**

उपोषणकर्ते विवेक गुल्हाने यांनी प्रकृती खालावूनही आंदोलन सुरूच ठेवत ठाम भूमिका मांडली.ते म्हणाले,कामगारांना त्यांचे हक्काचे पैसे मागताना आज रस्त्यावर उतरावे लागत आहेत, ही लाजिरवाणी बाब आहे.रतन इंडिया प्रशासनाने जाणूनबुजून कामगारांना वेठीस धरले आहे.जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत हे आंदोलन थांबणार नाही परिणामांची जबाबदारी प्रशासनाची असेल असेही ते म्हणाले.

## संपादकीय ......

# या देशाची काळजी कुणाला आहे?

*सध्या राज्यात महानगरपालिकांच्या प्रचाराचा केवळ धुरळाच उडत आहे असे नाही तर वादळ उसळलेले आहे. काही ठिकाणी तब्बल नऊ वर्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असल्यामुळे बर्याच वर्षांपासून थांबून राहिलेले इच्छुक अक्षरश: तुटून पडले आहेत. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. इतके पक्ष आणि गट निर्माण झालेले आहेत की, त्यामुळे तुंबळ चढाओढ सुरू आहे. काही राजकीय नेत्यांनी आपले कुटुंबीय आणि जवळचे नातेवाईक यांना तिकिटे देऊन त्यांची सोय लावली आहे. त्यांचा उताविळपणा पाहिल्यावर जणूकाही पुन्हा निवडणुका होणारच नाहीत की, काय असे वाटू लागले आहे.*

*राजकारणाच्या माध्यमातून जनसेवा केली जात असते, पण जनसेवेसाठी ज्या तुंबळ हाणामार्या सुरू आहेत, काहींचे बळीही जात आहेत, ते पाहिल्यावर हे सगळे जनसेवेसाठी चाललेले आहे की, आपल्या स्वार्थासाठी चालले आहे, असा प्रश्न पडतो. कारण लोकांची सेवा करता करता स्वत: गडगंज श्रीमंत होण्याचा धंदा म्हणजे राजकारण, अशी राजकारणाची अलीकडच्या काळात व्याख्या झाली आहे. जे नेतेमंडळी आता मते मागण्यासाठी लोकांच्या दारोदारी जातात, त्यापैकी जे निवडून येतात, त्यांना लोकांची आता वाटते तशी कळकळ वाटते का? आता लोकांच्या दारोदारी जाणारे जेव्हा निवडून येतात, तेव्हा लोकांना त्यांच्या दारी किती फेर्या माराव्या लागतात, याचा अनुभव लोकांना येत असतो. निवडणुकांच्या प्रचाराच्या वेळी उमेदवार ज्या पातळीवर जाऊन एकमेकांवर आरोप करत आहेत, ते पाहिल्यावर आपल्या देशात खरोखर लोकशाही स्वातंत्र्य आहे की, स्वैराचार आहे, असा प्रश्न पडतो. त्यात पुन्हा एकमेकांवर आरोप करणारी मंडळी आपल्या सोयीसाठी पक्ष बदल करून लोकांना तोंडात बोटच नाही तर हात घालायची पाळी आणतात, इतके सारे अनपेक्षित असते.*

*एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकाचा प्रचार करताना भाजप नेत्या नवनीत राणा यांनी पूर्वी केलेल्या विधानावर तोशेरे ओढले. निवडणूक असल्यामुळे आपल्या बाजूने लोकांची मते ओढण्यासाठी टीका केली जाते. त्या माध्यमातून लोकांच्या मतांचे ध्रुवीकरण केले जाते. उमेदवार हिंदू असेल तर तो हिंदूंची जास्तीत जास्त मते आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करतो. दुसर्या बाजूला मुस्लीम उमेदवार त्याला पोषक असलेली टीका करून मुस्लिमांची जास्तीत जास्त मते आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करत असतो. खरे तर अशा विधानांमुळे सामाजिक दुही निर्माण होत असते. खरे तर निवडणुका या सगळ्यांच्या विकासासाठी असतात, त्या काही विशिष्ट पक्षाच्या आणि त्याचे नेते, कार्यकर्ते यांच्या विकासासाठी मर्यादित नसतात.*

*आपल्या देशात लोकशाही शासन प्रणाली आहे, त्यामुळे एक नागरिक म्हणून आपण निवडणुकांमध्ये सहभागी व्हायला हवे. मुळात कुणाला धर्म किंवा जातीचा आधार घेऊन आवाहन करणे चुकीचे आहे. एक है तो सेफ है, असे जर एखाद्या पक्षातील प्रमुख नेते म्हणत असतील तर हा देश अजून स्वतंत्र झालेला आहे की नाही, अशी शंका येते. कारण ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्यानंतर आपण सर्व भारतीय म्हणून समान पातळीवर आलेलो आहोत. त्यामुळे निवडणुकांच्या माध्यमातून जेव्हा आपण आपले प्रतिनिधी निवडून देतो तेव्हा एक नागरिक म्हणून सामोरे जायला हवे. त्यावेळी आपल्याला मते मिळवण्यासाठी जाती आणि धर्माचा वापर करावा लागत असेल तर आपण अजून लोकशाहीसाठी परिपक्व झालेलो नाहीत, असाच त्याचा अर्थ आहे.*

*नवनीत राणा यांनी काही दिवसांपूर्वी एका मौलानांच्या विधानाचा संदर्भ देत हिंदूंनी किमान चार मुलं जन्माला घातली पाहिजेत असे विधान केले होते. त्यांच्या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला होता. याच मुद्द्यावरून ओवेसींनी अमरावतीच्या सभेत राणांवर पलटवार केला. चार नव्हे तर आठ मुले जन्माला घाला, आम्हाला त्याच्याशी काहीही देणेघेणे नाही. अशा वक्तव्यांमुळे जनतेचे लक्ष रोजगार, महागाई आणि नागरी सुविधा यासारख्या मूलभूत प्रश्नांपासून दूर नेले जात असल्याचा आरोप ओवेसी यांनी केला. काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही लोकांनी कमीत कमी तीन मुले जन्माला घालायला हवीत, असे आवाहन केले होते. त्यापूर्वी विश्व हिंदू परिषदेचे दिवंगत नेते अशोक सिंघल यांनीही हिंदूंनी जास्त मुले जन्माला घालण्याचे आवाहन केले होते.*

*हिंदूंसाठी हिंदुस्तान आणि मुसलमानांसाठी पाकिस्तान या तत्वावर महमदअली जिनांनी भारताची फाळणी केली होती. पण सगळेच मुसलमान पाकिस्तानात गेले नाहीत, आम्ही इथले कायदेकानून मानून इथे राहू असे त्यांचे म्हणणे होते. पण आज भारतात पाकिस्तानपेक्षाही दुप्पट मुसलमानांची संख्या आहे. त्यातूनच हिंदुत्ववादी नेत्यांमध्ये भय निर्माण होते. त्यामुळेच ते हिंदूंच्या लोकसंख्येचा विषय निवडणुकीत आणून त्याचा हिंदू एकगठ्ठा मते आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करतात. एका बाजूला म्हणायचे की, भारतीय संविधान धर्मनिरपेक्ष आहे. त्याच वेळी म्हणायचे की, कुटुंब नियोजन करायला आमचा धर्म परवानगी देत नाही. त्यामुळे कुठल्याही धर्माचे राजकीय नेते असूदे, त्यांनी देशाचा विचार करायला हवा. कारण धर्माच्या नावाने तयार झालेल्या पाकिस्तान आणि बांगलादेश यांची आज काय दुर्दक्षा झालेली आहे ते आज आपण पाहत आहोत. धार्मिक शक्तिप्रदर्शनाच्या चढाओढीत देशाची उपेक्षा होता नये.*

# खुला प्रवर्ग कुणासाठी राखीव नाही, सरकारी नोकरीत निवड मेरिटवर व्हावी

## सुप्रीम कोर्टाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नवी दिल्ली –** सरकारी नोकरीत चांगले गुण मिळवून पात्र ठरलेल्या एससी, एसटी, ओबीसी आणि एथड प्रवर्गातील उमेदवाराला अनारक्षित श्रेणीतून जागा मिळण्याचा अधिकार आहे. खुल्या श्रेणीतील जागा कुठल्याही खास सामाजिक वर्गासाठी नाही. या जागा सर्वांसाठी खुल्या आहेत. त्या मेरिटच्या आधारेच भरायला हव्यात असं सुप्रीम कोर्टाने स्पष्ट सांगितले आहे.

या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने स्पष्टपणे मेरिटच्या आधारे आरक्षित श्रेणीतील उमेदवाराला खुल्या प्रवर्गातून नोकरी मिळू शकते असं सांगितले आहे. निवड प्रक्रिया सुरुवातीच्या टप्प्यात मेरिटच्या आधारे यादी जारी व्हायला हवी असं कोर्टाने सांगितले. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर, जर आरक्षित प्रवर्गातील एखाद्या उमेदवाराला सुरुवातीच्या टप्प्यात सामान्य प्रवर्गात निश्चित केलेल्या कट ऑफपेक्षा जास्त गुण मिळाले असतील तर त्याला खुल्या यादीतून जागा मिळायला हवी. जर पुढील निवड प्रक्रियेच्या टप्प्यात त्याला अधिक गुण मिळाले तर त्याला सामान्य कोट्यातून नोकरी मिळू शकते. जर पुढच्या टप्प्यात त्याला कमी गुण मिळाले तर त्याला पुन्हा आरक्षित प्रवर्गातून जागा मिळू शकते.



न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने असे म्हटले आहे की, राखीव श्रेणीतील उमेदवारांना त्यांच्या श्रेणीमुळे वंचित ठेवले जाऊ नये. हे सामाजिक न्यायाच्या संकल्पनेविरुद्ध असेल. हे प्रकरण राजस्थान उच्च न्यायालय, राजस्थान जिल्हा न्यायालये आणि न्यायिक अकादमीमध्ये एकूण २,७५६ कनिष्ठ न्यायिक सहाय्यक आणि लिपिक ग्रेड-खख पदांसाठी निवड प्रक्रियेशी संबंधित आहे. २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या या प्रक्रियेत दोन टप्पे होते. ३०० गुणांची लेखी परीक्षा आणि १०० गुणांची संगणक-आधारित टायपिंग चाचणी होती.

मे २०२३ मध्ये लेखी परीक्षेचे निकाल जाहीर झाल्यानंतर भरती आयोगाने टायपिंग परीक्षेसाठी शॉर्टलिस्ट तयार केली. सामान्य श्रेणीसाठी कट-ऑफ सुमारे १९६ गुणांचा होती तर अनेक राखीव श्रेणींसाठी कट-ऑफ खूप जास्त होता, काही प्रकरणांमध्ये २२० पेक्षा जास्त होता. यामुळे अनेक राखीव श्रेणीतील उमेदवार ज्यांनी सामान्य श्रेणीच्या कट-ऑफपेक्षा जास्त गुण मिळवले होते ते प्राथमिक निवड यादीत येऊ शकले नाहीत. त्यांच्या श्रेणीसाठी कट-ऑफ जास्त असल्याने या उमेदवारांना टायपिंग चाचणीला बसण्याची संधी नाकारण्यात आली. हे प्रकरण राजस्थान उच्च न्यायालयात पोहोचले. तेथे श्रेणीनिहाय शॉर्टलिस्टिंग चुकीचे आहे असं खंडपीठाने असा निकाल दिला. संविधानाच्या कलम १६(४) वंचित वर्गांसाठी आरक्षणाला परवानगी देते. मनमानी वर्गीकरणामुळे त्याचा उद्देशच कमकुवत होईल असं उच्च न्यायालयाने म्हटले.

आता सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला आहे. राखीव श्रेणीतील उमेदवारांना दुहेरी फायदे मिळाले आहेत हा युक्तिवाद सुप्रीम कोर्टाने फेटाळून लावला. उमेदवाराला कमी पात्रता गुण किंवा वयात सूट असे फायदे मिळाले तरच आरक्षणाचा फायदा होतो. केवळ राखीव प्रवर्गाचा सदस्य असणे म्हणजे आरक्षणाचा लाभ घेणे असे मानले जाऊ शकत नाही असं न्यायालयाने म्हटले.

# कोणता नाश्ता सर्वात उत्तम? सकाळी काय खाल्लं पाहिजे

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**



सकाळच्या घाईगडबडीत बहुतांश वेळा आपण पटकन तयार होणारा नाश्ता निवडतो. मात्र, सकाळी आपण काय खातो याचा थेट परिणाम आपल्या पचनसंस्थेवर, ऊर्जेवर आणि दिवसभर लागणाऱ्या भुकेवर होत असतो. अनेकदा आरोग्यदायी वाटणाऱ्या काही पदार्थांचा आतून आपल्या गट हेल्थवर नकारात्मक परिणामही होऊ शकतो. त्यामुळे योग्य आणि संतुलित नाश्ता निवडणं फार महत्त्वाचं ठरतं. रोजच्या नाशत्यामध्ये आपण काय खाऊ शकतो हे आपण पाहामार आहोत.




**अंडी –** अंड्यांमध्ये उच्च दर्जाचं प्रोटीन असतं, जे शरीराला सहज पचतं. अंडी खाल्ल्याने पोट बराच वेळ भरलेलं राहतं आणि वारंवार भूक लागत नाही. त्यामुळे गट हेल्थ आणि मेटाबॉलिझमसाठी अंडी उत्कृष्ट नाश्ता मानले जातात.

**ग्रीक योगर्ट–** यामध्ये भरपूर प्रोटीन असतं आणि त्यातील प्रोबायोटिक्स पचनक्रिया सुधारण्यास मदत करतात. मात्र, साखर मिसळलेलं फ्लेवर्ड योगर्ट टाळावं, कारण त्यामध्ये जास्त साखर असते, जी आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.

**ओट्स–** ओट्स हा देखील चांगला नाश्त्याचा पर्याय आहे. ओट्समध्ये असलेला बीटा-ग्लूकान फायबर गट हेल्थसाठी फायदेशीर असून ऊर्जा हळूहळू सोडण्यास मदत करतो. मात्र, इंस्टंट ओट्सपेक्षा स्टील-कट किंवा रोल्ड ओट्स निवडणं अधिक चांगलं, कारण जास्त प्रक्रिया झालेल्या ओट्समुळे रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढू शकते.

**एवोकाडो टोस्ट आणि पनीर–** एवोकाडो टोस्टमध्ये असलेले हेल्दी फॅट्स आणि फायबर पोट भरलेलं ठेवतात आणि पचनसंस्थेला आधार देतात. यासोबतच पनीर म्हणजेच कॉटेज चीजही उत्तम नाश्त्याचा पर्याय आहे. पनीरमधील केसिन प्रोटीन हळूहळू पचतं, त्यामुळे दीर्घकाळ तृप्ती मिळते.

**इडली-डोसा आणि इतर पर्याय–** याशिवाय स्मूदी, पीनट बटर तसेच इडली-डोसा हे नाश्त्यासाठी मध्यम स्वरूपाचे पर्याय असल्याचं त्यांनी नमूद केलं आहे. मात्र, सीरियल आणि ग्रेनोला यांना तुलनेने कमी रेटिंग देण्यात आली आहे.

# गहू पिकावरील प्रमुख रोग कोणते? प्रभावी उपाययोजना

**दि. ६ विदर्भ प्रजासत्ताक**

गहू हे महाराष्ट्रातील रब्बी हंगामातील अत्यंत महत्त्वाचे पीक आहे. मात्र, इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील गहू उत्पादन प्रति हेक्टर कमी आहे.

यामागे हवामानातील बदलांसोबतच गहू पिकावरील विविध रोगांचा प्रादुर्भाव हे प्रमुख कारण आहे. योग्य वेळी रोगांची ओळख व शास्त्रीय नियंत्रण न केल्यास उत्पादनात मोठी घट येऊ शकते.

गहू पिकामध्ये प्रामुख्याने तांबेरा (गेरवा), काजळी (काणी), करपा, मूळकूज व खोडकूज हे रोग आढळतात.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**तांबेरा –** तांबेरा हा गहू पिकावरील सर्वात घातक व नुकसानकारक रोग मानला जातो. या रोगामुळे दाणे सुकतात, वजन कमी होते व उत्पादनात मोठी घट होते.

**तांबेराचे प्रकार**

खोडावरील काळा तांबेरा
पानावरील नारिंगी तांबेरा
पिवळा तांबेरा
खोडावरील काळा तांबेरा
खोडावरील काळा तांबेरा

रोगकारक बुरशी : पक्सिनिया ग्रामिनीस ट्रिटीसी

**लक्षणे काय?**

ओंबी अवस्थेत पानांवर, खोडावर व ओंबीवर तपकिरी रंगाचे लांबट पूरळ दिसतात

हाताने स्पर्श केल्यास तपकिरी भुकटी लागते

तापमान वाढल्यावर पूरळ काळसर रंगाचे होतात

रोपांची वाढ खुंटते, फुटवे कमी होतात

अनुकूल हवामान : १५ ते ३५ अंश सेल्सियस तापमान व जास्त आर्द्रता

**पानावरील नारिंगी तांबेरा**

रोगकारक बुरशी : पक्सिनिया रेकॉनडिटा

**लक्षणे काय?**

पानांवर व देठांवर नारिंगी रंगाचे लहान गोल पूरळ

सुरुवातीला पानांच्या वरच्या बाजूला, नंतर दोन्ही बाजूंना दिसतात

अनुकूल तापमान : १५ ते २५ अंश सेल्सियस

**पिवळा तांबेरा** रोगकारक बुरशी : पक्सिनिया स्ट्रीफोरमीस

**लक्षणे काय?–** पानांच्या शिरांवर पिवळ्या रंगाचे बारीक पूरळ सरळ रेषेत




थंड व दमट हवामानात जास्त प्रमाणात आढळतो

**तांबेरा रोगाचा प्रसार**

हा रोग फक्त गहू पिकावर टिकतो

दक्षिण भारतातील निलगिरी व पलनी टेकड्यांमधून वादळी वाऱ्याने बीजाणू १८०० किमीपर्यंत पसरतात

अनुकूल हवामानात मैदानी भागात रोग झपाट्याने वाढतो

तांबेरा रोग नियंत्रण उपाय काय?

वेळेवर पेरणी करावी

रोगप्रतिकारक वाणांची निवड करावी

नत्र खताचा अतिरेक टाळावा

अति पाणी देऊ नये

रोग दिसताच 'ही' फवारणी करावी

प्रोपीकोनॅझोल १ मि.ली./लिटर पाणी

किंवा मँकोझेब २ ग्रॅम/लिटर पाणी

गरज असल्यास १५ दिवसांनी पुन: फवारणी

काजळी (काणी रोग)

रोगकारक बुरशी : युस्टीलँगो ट्रिटीसी

**लक्षणे काय?**

दाण्याऐवजी काळी भुकटी तयार होते

थंड व आर्द्र हवामानात रोग जास्त वाढतो

**नियंत्रण उपाय काय?**

रोगमुक्त बियाण्याची निवड

उष्णजल बीजप्रक्रिया :

तास थंड पाण्यात भिजवणे

नंतर ५४ अंश सेल्सियस तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे

**रासायनिक बीजप्रक्रिया :**

कार्बेन्डाझिम १ ग्रॅम किंवा थायरम ३ ग्रॅम/किलो बियाणे

रोगट ओंब्या काढून नष्ट कराव्यात

**करपा रोग**

रोगकारक बुरशी : अल्टरनेरिया ट्रिटीसिना

**लक्षणे काय?**

पानांवर करपट ठिपके

ठिपके एकत्र येऊन संपूर्ण पान करपते

बागायती गव्हावर जास्त प्रादुर्भाव

**नियंत्रण उपाय**

रोगमुक्त बियाणे वापर

बीजप्रक्रिया : थायरम ३ ग्रॅम/किलो

उभ्या पिकावर प्रादुर्भाव दिसल्यास मँकोझेब २० ग्रॅम / १० लिटर पाणी फवारणी

मूळकूज व खोडकूज

रोगकारक बुरशी

ूळकूज : फ्युजारियम

खोडकूज : रायझोक्टोनिया

**लक्षणे काय?**

रोपे पिवळी पडून सुकतात

मुळे व खोडाचा खालचा भाग कुजतो

झाडे कोलमडून पडतात

**नियंत्रणाचे उपाय**

बीजप्रक्रिया : थायरम ३ ग्रॅम/किलो

पाणी साचणार नाही याची काळजी

संतुलित खत व्यवस्थापन

गहू पिकातील रोगांचे वेळीच निदान, प्रतिबंधात्मक उपाय व शिफारशीनुसार रासायनिक फवारणी केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ होऊ शकते. शेतकऱ्यांनी कृषी विद्यापीठांच्या शिफारशीप्रमाणेच व्यवस्थापन करावे.

**– डॉ. राजेंद्र गाडे, अमोल वि. शितोळे**

(वनस्पती रोगशास्त्र विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला)

# लहान गल्ली, मोठं स्वप्न चांदूर रेल्वेच्या अर्शदची थेट आयजीजीएमसी नागपूरला झेप!

## गाडगेबाबा मार्केट व्यापारी संघटनेने केला अर्शदचा सत्कार

## शासकीय कोट्यातून एमबीबीएस ला प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६चांदूर रेल्वे–** चांदूर रेल्वे सारख्या छोट्या शहरातील एका सामान्य कुटुंबातील मुलाने असामान्य यश संपादन करून संपूर्ण शहराचा अभिमान वाढविला आहे. येथील गाडगेबाबा मार्केट परिसरातील रहिवासी अर्शद हुसैन इकबाल हुसैन याला शासकीय कोट्यातून नागपूर येथील इंदिरा गांधी गव्हर्मेंट मेडिकल कॉलेज (आयजीजीएमसी) मध्ये एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला आहे.महत्त्वाचे म्हणजे, कुठल्याही बाहेरच्या राज्यात किंवा मोठ्या शहरात जाऊन महागड्या कोचिंग क्लासेस न लावता, केवळ अमरावती (बडनेरा) शहरात राहून सातत्यपूर्ण मेहनत, शिस्तबद्ध अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर अर्शदने हे यश संपादन केले. हे यश म्हणजे केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण चांदूर रेल्वे शहरासाठी गर्वाची बाब ठरली आहे.अर्शदच्या या दैदीप्यमान यशाबद्दल चांदूर रेल्वे शहरातील गाडगेबाबा मार्केट व्यापारी संघटनेतर्फे त्याचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी सुधाकर नाचवणकर, नितीन गवळी, प्रताप खंडार, संजय कोल्हे, मंगेश डाफ, नयन भोयर, शैलेश डाफ, सुनील कांडलकर, अंकुश जोशी, गौरव कुटेमाटे, अजहर हुसैन यांसह इतर नागरिकांनी अर्शदचे अभिनंदन करत त्याच्या पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. अर्शदच्या या यशामुळे चांदूर रेल्वेतील अनेक विद्यार्थी व पालकांना नवी दिशा आणि प्रेरणा मिळाली असून, शहरातील हा मुलगा आता डॉक्टर होण्याच्या प्रवासात पुढे निघाला आहे.



छोट्या शहरातील मुलांनीही योग्य मार्गदर्शन, मेहनत आणि आत्मविश्वास ठेवला तर देशातील नामांकित वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवता येतो, असा प्रेरणादायी संदेश अर्शद हुसैनने दिला.

# ज्येष्ठ काँग्रेस नेते सुरेश कलमाडी यांचं निधन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.६पुणे–** माजी केंद्रीय मंत्री व ज्येष्ठ काँग्रेस नेते सुरेश कलमाडी यांचं मंगळवारी पहाटे निधन झालं. ते ८१ वर्षांचे होते. सुरेश कलमाडी यांच्या कार्यालयाच्या हवाल्याने एएनआयनं हे वृत्त दिलं आहे. सुरेश कलमाडी यांच्यावर गेल्या काही काळापासून दीर्घकालीन आजारामुळे पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचार चालू होते. मात्र आज पहाटे ३.३० च्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. सुरेश कलमाडी यांनी आपल्या कार्यकाळात राजकीय जबाबदाऱ्यांबरोबरच भारतीय ऑलिम्पिक महासंघाचं अध्यक्षपदही भूषवलं होतं. याशिवाय ते प्रदीर्घ काळ पुण्यातून खासदार म्हणून निवडून जात होते. शिवाय त्यांनी अल्पकाळ रेल्वे राज्यमंत्री म्हणूनही कार्यभार पाहिला होता.'पुण्याचे माजी खासदार, केंद्रीय राज्यमंत्री आणि ऑलिम्पिक महासंघाचे माजी अध्यक्ष सुरेश कलमाडी (८१ वर्षे) यांचं पुण्यात आज निधन झालं. पहाटे साडेतीनच्या सुमारास प्रदीर्घ आजारामुळे उपचार घेत असताना त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यामागे त्यांची पत्नी, मुलगा, सून, दोन मुली, जावई आणि नातवंडं असा परिवार आहे', अशी माहिती जाहीर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आली आहे. सुरेश कलमाडी यांच्या निधनामुळे पुण्यातील राजकीय वर्तुळावर शोककळा पसरली आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ६ जानेवारी २०२६ शहर/ग्रामिण

# प्रकाश पोहरे यांना जीवन गौरव, विलास बडे राज्यस्तरीय व वसंतराव घुईखेडकर विभागस्तरीय पुरस्काराचे मानकरी

## अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे पत्रकारिता पुरस्कार जाहीर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ अमरावती,–** मराठी पत्रकार परिषद मुंबई संलग्नित अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे दरवर्षी देण्यात येणारे पत्रकारितेतील विविध पुरस्कार आज संघटनेचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांनी जाहीर केले.

सोमवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता श्री हनुमान व्यायान प्रसारक मंडळाच्या ऑडिटोरिअम येथे आयोजित सोहळ्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. अभरावली जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे जीवन गौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार संपादक प्रकाश पोहरे, राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी IBN LOKMAT चे वृत्त निवेदक असलेले विलास बडे, विभागस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी वसंतराय घुईखेडकर, जिल्हास्तरीय (शहर) पत्रकारिता पुरस्कार प्रविण आहुजा आणि जिल्हास्तरीय (ग्रामीण) पत्रकारिता पुरस्कारासाठी चंद्रकांत भड मानकरी ठरले आहेत.अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघ हा अनेक वर्षांपासून जिल्हयात कार्यरत आहे. या संघामध्ये जिल्ह्यातून प्रकाशित होणाऱ्या दैनिकांचे संपादक, जिल्हा प्रतिनिधी, प्रतिनिधी, पत्रकार, छायाचित्रकार तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे जिल्हा प्रतिनिधी सदस्य म्हणून कार्यरत आहे. या संघातर्फे दरवर्षी पत्रकारांना विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

### अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे सन २०२५ चे मानकरींचा परिचय

राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार ३० वर्षपेक्षा अधिक काळ पत्रकारितेचा अनुभव असलेले प्रकाश पोहरे यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. प्रकाश पोहरे हे राजकीय, पर्यावरण आणि शेतकऱ्यांच्या विषयांवर लिखाण करणारे आणि 'दैनिक देशोन्नती' या वृत्तपत्राचे संपादक आहेत. आपल्या लिखाणातून रोखठोक भूमिका मांडणारे पत्रकार-संपादक म्हणून प्रसिध्द आहेत. जीवन गौरव पुरस्कार 'स्थ. दादासाहेब काळमेघ स्मृती जीवन गौरव पत्रकारिता पुरस्कार' या नावाने राहील. या पुरस्काराचे पुरस्काराचे पुरस्कर्ते हेमंतराव काळमेघ राहतील. या पुरस्काराचे स्वरूप रोख रूपये ४१,०००/- रोख, सन्मानचिन्ह व शाल श्रीफळ राहील.

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे देण्यात येणाऱ्या सन २०२५ या वर्षीच्या पत्रकारिता पुरस्काकरिता पाच सदस्यीय निवड समिती तयार करण्यात आली होती. या समितीत विजय ओडे, नितेश राऊत, प्रणव निर्वाण, सुधीर भारती, अनुप गाडगे यांचा समावेश होता. तसेच या समितीचे पदसिध्द सदस्य संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल, महासचिव प्रफुल्ल घवळे आहेत.

# शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा देण्यासाठी महावितरण कंपनीचे अधिकारी उदासीन !

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा महावितरण कंपनीला ८ दिवसांचा अल्टिमेट!



## संत्रा उत्पादक शेतकरी आंदोलनाच्या तयारीत !

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६मोर्शी**

मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विजेच्या समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनानुसार स्थानिक स्तरावर चर्चा करून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याकरीता ५ जानेवारी रोजी उप विभागीय अधिकारी रवींद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत तहसील कार्यालय मोर्शी येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते.

महावितरण कंपनीतर्फे ग्रामीण भागात शेती पंपांना वीजपुरवठा केला जातो. यात सातत्याने वीजपुरवठ्याच्या वेळा बदलल्या जातात. बारा महिन्यात बारा नवीन वेळांचे वेळापत्रक प्रसिध्द केले जाते. दिवसातून केवळ आठच तास शेतीपंपांना वीज दिली जाते. त्यातही विजेचा लपंडाव सुरु असतो. कधी दिवसा, तर कधी रात्री वीजपुरवठा केला जात असून, महावितरण कंपनीने शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळू नये. शेतीसाठी रात्रीचा केला जाणारा वीज पुरवठा बंद करून शेतकऱ्यांना दिवसा एकच वेळ निश्चित करुन पुरेशा दाबाने वीजपुरवठा करावा, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयामध्ये झालेल्या बैठकीमध्ये कार्यकारी अभियंता यांना केली. महावितरणकडून कृषी विद्युत पंपांसाठी निर्धारीत वेळेतच वीजपुरवठा केला जातो. बहुतांशी ठिकाणी सोमवार ते गुरुवार या चार दिवशी दिवसा, तर शुक्रवार ते रविवार या तीन दिवस रात्री प्रत्येकी आठ तास वीजपुरवठा केला जात आहे. त्यातही अनेकदा वीजपुरवठा खंडीत होत असल्याने जेमतेम चार ते पाच तास वीज मिळते. शेतकऱ्यांच्या सांगण्यानुसार सलग आठ तास पूर्ण दाबाने वीजपुरवठा कधीच केला जात नाही. यातून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असते. नियमित व पुरेसा वीजपुरवठा होत नसल्यामुळे हजारो हेक्टर क्षेत्रावरील संत्रा उत्पन्नावरही त्याचा मोठा परिणाम होत असल्याचे रुपेश वाळके यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर सुद्धा कार्यकारी अभियंता यांनी वेळापत्रकामध्ये बदल करून दिवसा वीज पुरवठा करणे शक्य नसल्याचे सांगितल्यामुळे हजारो शेतकऱ्यांनी महावितरण कंपनी विरोधात रोष व्यक्त करून ८ दिवसामध्ये दिवसा वीज पुरवठा न मिळण्यास महावितरण कंपनीच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता यांना देण्यात आला. यावेळी बैठकीला उप विभागीय अधिकारी रवींद्र पवार, कार्यकारी अभियंता कासट साहेब, उप कार्यकारी अभियंता उमाळे साहेब, तहसीलदार सागर ढवळे, वन परिक्षेत्र अधिकारी चौधरी साहेब राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रफुल भोजने, निलेश कडू, मनीष गुडधे, सोमेश्वर काळे, सतीश गतफणे, यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# नगरपालिकांमध्ये उपाध्यक्ष, स्वीकृत सदस्यांसाठी रस्सी खेच :आजपासून नोटीस प्रारंभ

## १६ जानेवारीपूर्वी पहिली बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** अमरावती जिल्ह्यातील १० नगरपालिका आणि २ नगरपंचायतींमध्ये उपाध्यक्ष आणि स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी चढाओढ सुरू आहे. निवडणूक निकालानंतर २५ दिवसांच्या आत होणाऱ्या पहिल्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पूर्ण करावी लागते. हा कालावधी १६ जानेवारी रोजी संपत असल्याने त्यापूर्वीच बैठकांचे आयोजन केले जात आहे. काही पालिकांमध्ये बैठका निश्चित झाल्या असून, नोटीस पाठवण्यास सुरुवात झाली आहे.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, नवनिर्वाचित नगराध्यक्षांना ही पहिली बैठक बोलवावी लागते आणि त्यांच्याच अध्यक्षतेखाली ती पार पडते. या बैठकीत उपाध्यक्ष आणि संख्याबळाच्या आधारे स्वीकृत नगरसेवकांची निवड केली जाते. स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी शासनाने काही निकष निश्चित केले आहेत.

या निकषांमध्ये पालिकेचे ज्ञान आणि अनुभव असलेल्या व्यक्तींचा समावेश आहे, जसे की माजी लोकप्रतिनिधी, शिक्षण तज्ज्ञ, डॉक्टर, वकील, मुख्याध्यापक, निवृत्त प्राध्यापक, सनदी लेखापाल, अभियांत्रिकी पदविकाधारक, विधी शाखेचे पदवीधारक, निवृत्त मुख्याधिकारी किंवा मनपा आयुक्त आणि पालिका क्षेत्रातील अशासकीय संघटनेचे पदाधिकारी.



स्वीकृत सदस्यांसाठी '१० नगरसेवकांमागे एक' असे सूत्र आहे. प्रत्येक नगरपालिका सभागृहाची सदस्य संख्या एकने वाढवण्यात आली असून, हे वाढीव सदस्य म्हणजे संबंधित शहराचे नगराध्यक्ष आहेत. या सूत्रानुसार, जिल्ह्यातील सर्वाधिक ४१ नगरसेवक असलेल्या अचलपूर नगरपालिकेत ४ स्वीकृत सदस्य निवडले जातील. अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, वरुड आणि मोर्शी येथे प्रत्येकी ३ स्वीकृत सदस्य असतील. धारणी आणि नांदगाव खंडेश्वर या दोन नगरपंचायतींसह धामणगाव रेल्वे, चांदूररेल्वे, चांदूरबाजार, चिखलदरा येथे प्रत्येकी २ स्वीकृत नगरसेवक निवडले जातील. दर्यापूर नगरपालिकेची पहिली बैठक ९ जानेवारी रोजी होणार असून, त्यासाठीच्या नोटीस पाठवण्यात आल्या आहेत.

नगराध्यक्षांनी बोलावलेली पहिली सर्वसाधारण सभा कोणत्याही परिस्थितीत तहकूब करता येणार नाही, अशी स्पष्ट सूचना सभेच्या नोटीसमध्ये सर्व सदस्यांना देणे बंधनकारक आहे. जिल्हाधिकाऱ्यांद्वारे प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून पात्र नामनिर्देशित उमेदवारांची यादी सभेपूर्वी प्राप्त झाल्यास, अशा सदस्यांची नावे बैठकीत वाचून दाखवण्यात येतील. पहिल्या सभेची नोटीस संबंधित नगरसेवकांना किमान सात दिवसांपूर्वी पाठवणे अनिवार्य आहे. राज्य शासनाच्या नगर विकास विभागाच्या २१ डिसेंबर २०१६ च्या नियमानुसार ही बैठक आयोजित केली जाते. या नियमात उपाध्यक्षांच्या निवडीसंदर्भातील तरतूद नमूद आहे. या निवडणुकीसाठी नगराध्यक्ष हेच पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहतील.

# संत गाडगे बाबा विद्यापीठात कर्मचारी संघाची निवडणूक

## १ फेब्रुवारीला मतदान आणि निकाल एकाच दिवशी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या शिक्षकेतर कर्मचारी संघाची निवडणूक १ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या निवडणुकीसाठी मतदान आणि मतमोजणी एकाच दिवशी घेतली जाईल. विद्यापीठाने यासंबंधीचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

निवडणूक अधिकारी म्हणून ऋतुराज दशमुखे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना विद्यापीठाच्या विद्या विभागातील संजय खोब्रागडे आणि मोहन इंगळे हे सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून मदत करतील.

निवडणूक अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने जारी केलेल्या वेळापत्रकानुसार, निवडणूक प्रक्रिया १६ जानेवारीपासून सुरू झाली. १६ जानेवारी रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली.

या यादीवर १९ जानेवारीपर्यंत आक्षेप नोंदवता येतील, त्यानंतर त्याच दिवशी दुपारी ४ वाजता अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

२० जानेवारी रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत नामांकन अर्जांची विक्री केली जाईल. त्यानंतर सलग दोन दिवस, म्हणजेच २० आणि २१ जानेवारी




रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत नामांकन अर्ज स्वीकारले जातील. निवडणुकीचे कामकाज कर्मचारी भवन येथे चालणार आहे.

नामांकन स्वीकारण्याची अंतिम तारीख २१ जानेवारी असून, त्याच दिवशी प्राप्त उमेदवारी अर्जांची छाननी केली जाईल. २१ जानेवारी रोजी सायंकाळी ६.१५ वाजता उमेदवारांची वैध आणि अवैध यादी जाहीर होईल. २२ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू होईल, ज्याची अंतिम तारीख २३ जानेवारी रोजी दुपारी २ वाजेपर्यंत आहे. त्यानंतर लगेच निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल.

१ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत विद्यापीठातील डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख अधिसभा सभागृहात मतदान होईल. मतदानानंतर लगेचच दुपारी २ वाजल्यापासून मतमोजणी सुरू केली जाईल आणि मतमोजणी पूर्ण होताच निकाल घोषित केला जाईल.

# आदिवासी विकास विभागाच्या राज्यस्तरीय स्पर्धेचे उद्घाटन

## कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती** आदिवासी विकास विभागामार्फत आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे उद्घाटन सोमवारी दि. ५ रोजी झाले. या स्पर्धेचे उद्घाटन राज्य माहिती आयोग आयुक्त रवींद्र ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्रीडा ध्वजाचे ध्वजारोहण करून क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली.

आदिवासी विकास अपर आयुक्त आयुषी सिंह, नाशिकचे अपर आयुक्त दिनकर पावरा, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अमित रंजन, झेनिच चंद्र दोनचुला, सिद्धार्थ शुकना तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, खेळाडू व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने आदिवासी कला व संस्कृतीचे दर्शन घडविणारी भव्य हस्तकला प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या दालनांमध्ये अमरावती विभागातील धारणी, अकोला, पुसद, कळमनुरी, किनवट तसेचशबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, धारणी यांनी सहभाग नोंदविला. याशिवाय नागपूर विभागातील देवरी प्रकल्पातील चिमुकल्यांनी तयार केलेल्या विविध कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन विशेष आकर्षण ठरले. या हस्तकला दालनांचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.उद्घाटन समारोपाच्या कार्यक्रमात अमरावती विभाग विरुद्ध नाशिक विभाग यांच्यातील हॉलीबॉल सामना चुरशीचा झाला. पहिल्या सेटमध्ये अमरावती संघाने २५ गुण, तर प्रतिस्पर्धी संघाने २० गुण मिळविले. दुसऱ्या सेटमध्ये अमरावती संधाने २५ गुण, तर प्रतिस्पर्धी संघाने १८ गुण प्राप्त केले. उत्कृष्ट सांघिक खेळ व दमदार कामगिरीच्या जोरावर अमरावती विभागाचा संघ विजयी ठरला.संपूर्ण कार्यक्रमातून आदिवासी विद्यार्थ्यांमधील क्रीडा कौशल्य, सांधिक भावना, शिस्त तसेच वारसा अधोरेखित झाला. आदिवासी हस्तकलेचा समृद्ध वारसा अधोरेखित आहे.

# महसूल कर्मचाऱ्याला मारहाण करून वाळूचा ट्रक पळवला

## तिवसा-कुऱ्हा मार्गावर घडला प्रकार, चालक-मालकासह दोघांवर गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६तिवसा**

तिवसा ते कुऱ्हा मार्गावर महसूल विभागाच्या कारवाईदरम्यान जप्त केलेला वाळूचा ट्रक कर्मचाऱ्याला मारहाण करून पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. महसूल सहाय्यक राहुल शंकरराव निस्वादे यांच्या तक्रारीवरून कुऱ्हा पोलिसांनी ट्रकचालक, मालकासह दोन अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना ४ जानेवारी रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घडली. तिवसा महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी गस्तीवर असताना, अंजनसिंगीमार्गे कुऱ्ह्याकडे येणारा एमएच ४९ सीडी ८७३७ क्रमांकाचा दहा चाकी ट्रक थांबवण्यात आला. तहसीलदार डॉ. मयूर कळसे, नायब तहसीलदार आशीष नागरे, महसूल सहाय्यक राहुल निस्वादे, ग्राम महसूल अधिकारी चरणसिंग दुलत आणि महसूल



सेवक सूरज माथुलकर यांनी तपासणी केली असता, ट्रकमध्ये अवैध वाळू आढळून आली. त्यामुळे तहसिलदारांनी ट्रक जप्त करून तिवसा तहसील कार्यालयात नेण्याचे निर्देश दिले.ट्रक तहसील कार्यालयात घेऊन जात असतानाच, एक भरधाव स्विफ्ट डिझायर कार ट्रकच्या आडवी आली. कारमधील दोन अज्ञात व्यक्ती आणि ट्रक मालक खाली उतरले. त्यांनी महसूल सहाय्यक निस्वादे यांची कॉलर पकडून त्यांना बाहेर ओढले, मारहाण केली आणि ट्रकमधील वाळू रस्त्यावर टाकून ट्रक पळवून नेला.या घटनेनंतर महसूल सहाय्यक निस्वादे यांनी तात्काळ तहसीलदार यांना माहिती दिली आणि कुऱ्हा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, चांदुर रेल्वे येथील ट्रकमालक लक्ष्मण चौधरी, ट्रकचालक आणि दोन अज्ञातांविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला आहे. कुऱ्हा पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.या घटनेबाबत तिवसा तहसीलदार डॉ. मयूर कळसे यांनी माहिती दिली की, एकाच रात्री दोन ट्रकवर जप्तीची कारवाई करण्यात आली होती, त्यापैकी एक ट्रक कर्मचाऱ्याला मारहाण करून पळवण्यात आला. त्यांनी सांगितले की, ट्रकचालक व मालकाविरुद्ध कुऱ्हा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली असून, आरटीओ आणि ईटीपीला हा ट्रक ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्यासंदर्भात पत्र पाठवण्यात आले आहे.

# हॉटेल, रेस्टॉरंट व सर्व दवाखान्यांना कचरा व्यवस्थापनाचे सक्त निर्देश

## नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** अमरावती शहर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्यासाठी हॉटेल, रेस्टॉरंट, मंगल कार्यालये, लॉन्स, केटरिंग व्यवसाय तसेच हॉस्पिटल, नर्सिंग होम व खाजगी दवाखान्यांनी कचऱ्याची शास्त्रशुद्ध व नियमबद्ध विल्हेवाट लावणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट निर्देश अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी दिले आहेत. घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६, बायोमेडिकल वेस्ट व्यवस्थापन नियम आणि स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक व प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट, मंगल कार्यालये, बीअर बार, कॅन्टीन, होस्टेल तसेच खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या हॉकर्सकडून मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा तसेच उरलेले शिजवलेले अन्न निर्माण होत आहे.

त्याचप्रमाणे हॉस्पिटल, नर्सिंग होम, पॅथॉलॉजी लॅब व खाजगी दवाखान्यांमधून निर्माण होणाऱ्या बायोमेडिकल वेस्टची योग्य विल्हेवाट न लावता तो सार्वजनिक ठिकाणी टाकला जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

यामुळे सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे प्रशासनाने नमूद केले.या पार्श्वभूमीवर १६, २६ डिसेंबर २०२५ व ५ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण करणाऱ्या बल्क वेस्ट जनरेटर आस्थापनांनी ओला व सुका कचरा



वेगवेगळ्या कंटेनरमध्ये साठवणे बंधनकारक करण्यात आले आहे. मंगल कार्यालये व लॉन्समधील उरलेले चांगले अन्न सेवाभावी संस्थांमार्फत गरजू नागरिकांना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सर्व आस्थापनांनी मनपा नियुक्त कंत्राटदारालाच कचरा देणे बंधनकारक राहील.बायोमेडिकल वेस्ट संदर्भात शहरातील सर्व हॉस्पिटल व दवाखान्यांनी मनपाकडे नोंदणी करून केवळ अधिकृत एजन्सीकडेच कचरा द्यावा, अन्यथा कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले.

सिरींज, इंजेक्शन, औषधी अवशेष सार्वजनिक ठिकाणी टाकणे गंभीर उल्लंघन मानले जाईल.दरम्यान, आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी स्वच्छता विभागाच्या कामकाजाचा सखोल आढावा घेतला. कचरा संकलनात शिस्त, रात्रीची स्वच्छता, डस्टबिनसाठी योग्य जागा, तसेच नियमबाह्य कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले. शहर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिक व आस्थापनाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.




# तपासणीअंती ओके ईव्हीएम झोन कार्यालयात दाखल

## मनपा आयुक्तांकडून ईव्हीएम मशीन, स्ट्राँगरुमची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

महापालिका निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे. या अनुषंगाने आतापर्यंत मतदानासाठी आवश्यक १२०० कंट्रोल युनिट व २४०० बॅलेट युनिट प्राप्त झाले आहे. हे ई.व्ही.एम. मशीन मध्य प्रदेश मधून प्राप्त झाले आहे. या ईव्हीएमची तपासणी सुरु आहे. दरम्यान, तपासणीअंती ओक झालेल्या काही ईव्हीएम सांस्कृतिक भवन येथून निवडणूक झोन कार्यालयात देण्यात आल्या आहे. दरम्यान, निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सोमवार, ०५ जानेवारी २०२६ रोजी अमरावती येथील सांस्कृतिक भवन परिसरात असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (एश्ट) गोदामाची सविस्तर पाहणी





करून आढावा घेतला.

कार्यपद्धती, सुरक्षा व्यवस्थेचा आढावा

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ई.व्ही.एम. यंत्रांच्या साठवणूक, सुरक्षा व व्यवस्थापनाबाबत सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्याच्या उद्देशानेही पाहणी करण्यात आली. यावेळी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी ई.व्ही.एम. साठवणूक व व्यवस्थापन केंद्रातील प्रत्यक्ष कार्यपद्धती पाहून संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती जाणून घेतली.ई.व्ही.एम. मशीनची सुरक्षित साठवणूक, नोंदणी, देखभाल, तांत्रिक तपासणी तसेच गोदामातील सुरक्षा व्यवस्थेचा त्यांनी आढावा घेतला.

पडताळणीबाबत सूचना

गोदामातील सीसीटीव्ही व्यवस्था, प्रवेश नियंत्रण, रजिस्टर व कागदपत्रांची पडताळणी याबाबतही त्यांनी सूचना केल्या. ई.व्ही.एम. संदर्भातील सर्व कामकाज हे राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसारकाटेकोरपणे व पारदर्शक पद्धतीने राबविण्यात यावे, असे निर्देश आयुक्तांनी दिले.

ईव्हीएम झोन कार्यालयात रवाना

अमरावती महानगरपालिका निवडणूक विभागाने दिलेल्या माहितीनुसार नगरपालिका निवडणूकीतील आतापर्यंत १२०० कंट्रोल युनिट व २४०० बॅलेट युनिट प्राप्त झाले आहे. सदर ई.व्ही.एम. मशीन मध्य प्रदेश मधून प्राप्त झाले आहे. आज सांस्कृतिक भवन येथून निवडणूक झोन कार्यालयात ई.व्ही.एम. मशीन देण्यात 'आल्या आहे. मा. आयुक्त महोदयांनी संवेदनशील भागासाठी मायक्रो ऑब्झर्वर यांची नियुक्ती केलेली आहे. या पाहणीदरम्यान संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच ई. व्ही.एम. व्यवस्थापनाशी निगडीत कर्मचारी उपस्थित होते.

# भाजप उमेदवाराच्या विरोधात राणा दाम्पत्य मैदानात, मित्रपक्षाचे थेट आव्हान

## साईनगर प्रभागात चाललंय तरी काय? मतदार संभ्रमित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती–**

महापालिका निवडणुकीचा रणसंग्राम पेटलेला असताना राजकारणाचे वेगवेगळे रंग पाहायला मिळत आहेत. भाजपचा मित्रपक्ष असलेल्या युवा स्वाभिमान पक्षाने ३२ जागांवर उमेदवार उभे करून भाजप समोरच आव्हान उभे केले आहे. दुसरीकडे, साईनगर प्रभागात भाजपचे उमेदवार तुषार भारतीय यांच्या विरोधात भाजपच्या नेत्या माजी खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा उघडपणे मैदानात उतरल्याने भाजपचे कार्यकर्ते अचंबित झाले आहेत.



नवनीत राणा या भाजपच्या नेत्या आहेत. त्यांनी भाजपच्या उमेदवारांचा प्रचार करणे अपेक्षित असताना, एका प्रभागात युवा स्वाभिमान पक्षाच्या उमेदवारासाठी मोर्चेबांधणी करणे, हा एक सूडचक्राचा भाग मानला जात आहे. लोकसभा निवडणुकीची पार्श्वभूमी त्याला आहे. नवनीत राणा या निवडणुकीत पराभूत झाल्या होत्या. भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रोड शो चे आयोजन अमरावतीत करण्यात आले होते. या रोड शो दरम्यान, नवनीत राणा या मुख्यमंत्र्यांच्या समवेत खुल्या वाहनात उपस्थित होत्या. मुख्यमंत्र्यांच्या वाहनांचा ताफा साईनगर प्रभागाजवळ पोहोचताच नवनीत राणा या खुल्या वाहनातून उतरल्या. मुख्यमंत्री त्यानंतर थेट साईनगर येथील मंदिरात पोहोचले. पण त्यावेळी नवनीत राणा या हजर नव्हत्या. नवनीत राणा यांनी नंतर साई मंदिरात पोहोचून युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार सचिन भेंडे यांच्या प्रचाराचा नारळ फोडला. त्यांच्या या कृतीची चर्चा राजकीय वर्तुळात चांगलीच रंगली.

# मतदारांवर दबाव आणणाऱ्यांची खैर नाही

## चुकीचे पाऊल उचलल्यास बॉण्ड रद्द करणार : आयुक्त राकेश ओला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

मनपा निवडणूकीत मतदारांवर दबाव आणणाऱ्या व दहशत निर्माण करणाऱ्या उमेदवारांवर पोलीस अजिबात खैर करणार नाहीत. अशी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांवर पोलिसांचे बारकाईने लक्ष असून त्यापैकी काही उमेदवार पोलिसांच्या रडारवर आहेत. निवडणुकीच्या रिंगणातील काही उमेदवारांवर गंभीर प्रकाराचे गुन्हे दाखल आहेत. त्यांनी कुठलेही चुकीचे पाऊल उचलले तर त्यांचा बॉण्ड रद्द केला जाईल, असा परखड इशारा पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी दिला.मनपा निवडणूकीदरम्यान कुठल्याही प्रकाराची अप्रिय घटना घडू नये आणि शांततापूर्ण वातवरणात निवडणूक पार पडावी, या



दृष्टीकोनातून पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आयुक्तालयातील १० पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या सराईत व तडीपार गुन्हेगारांची माहिती घेतली आहे. त्यांच्यावर आतापर्यंत कुठली कारवाई करण्यात आली. याबाबत आढावा घेत प्रत्येकाचा रेकॉर्ड पोलीस आयुक्त स्वतः तपासत आहेत. आगामी काही दिवसात शहरातील काही गुन्हेगारतडीपार होऊ शकतात, तर काहींवर एमपीडीए कारवाईची शक्यता आहे. मनपा निवडणूकीच्या रिंगणात काही गुंड प्रवृत्तीचे उमेदवार आहेत.अशा गुन्हेगारांना बोलावून त्यांना ताकीददेण्यात येत आहे. मतदारांवर दबाव किंवा दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर त्यांनी दिलेला बॉण्ड रद्द करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्तांनी सांगितले.

### ८०५ मतदान केंद्रावर होणार मतदान

शहरातील २३१ इमारतीमधील ८०५ मतदान केंद्रवर मतदान होणार आहे. शहरात एकही सवेदशील मतदान केंद्र नाही, परंतु काही ठिकाणी मतदान केंद्रावर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्यामुळे त्या प्रत्येक मतदान केंद्रावर पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

### पोलिंग पार्टीला पोलीस सुरक्षा

मतदानाच्या आधी ईवीएम मशीन पोलीस सुरक्षेत प्रत्येक मतदान केंद्रावर पाठविण्यात येणार. मतदान झाल्यानंतर ईवीएम मशीन पोलीस सुरक्षेत नवसारी मार्गावरील डॉ. पंजाबराव देशमुख क्रिडा संकुल येथे ठेवल्या जातील. त्यानंतर पोलिंग पार्टीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षामुक्त केले जाईल.–

# अजिंठा मार्गावर भीषण अपघात, एसटी बस-दुचाकीच्या धडकेत तीन युवक ठार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६बुलढाणा :–**

बुलढाणा-अजिंठा राज्य मार्गावरील धाडनजीक झालेल्या भीषण अपघातात तिघा युवकांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. राज्य परिवहन मंडळाची बस आणि दुचाकीची भरवेगात धडक होऊन दुचाकी बसखाली आल्याने ही भीषण दुर्घटना घडली. तिन्ही मृत ढालसावंगी येथील रहिवासी होते.

आज सोमवारी, ५ जानेवारीला संध्याकाळी हा अपघात घडला. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगरकडून बुलढाणा जिल्ह्यातील धाडकडे येणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बस आणि विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीची समोरासमोर भरवेगात धडक झाली. यावेळी दुचाकी बसखाली अक्षरशः चिरडल्या गेल्याने तिघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. धाडनजीकच्या करडीच्या (धाड) पुलावर ही दुर्घटना घडली. अपघात इतका भयंकर होता की, यातील एका युवकाच्या डोक्याची कवटी फुटून त्यांच्या मेंदूचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.

मलकापूर आगाराची एमएच- ०६-बीडब्ल्यू-३६३८ क्रमांकाची एसटी बस आज ५ जानेवारीला छत्रपती संभाजीनगर येथून मलकापूर (जि. बुलढाणा)कडे जात होती. दुसरीकडे ढालसावंगी (ता.



बुलढाणा) येथील हे तिघे मोटारसायकलने धाडवरून करडी गावाच्या दिशेने जात होते. सदर बस सायंकाळी करडी (धाड) येथील पुलावर येताच या दोन्ही वाहनांमध्ये समोरासमोर जोरदार धडक झाली. यात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अंकुश पाडळे (३२), रवी चंदनशिव (२३) आणि कैलास शिंदे (३०) सर्व राहणार ढालसावंगी, तालुका व जिल्हा बुलढाणा, अशी मृतांची नावे आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे ढालसावंगी गावावर शोककळा पसरली आहे. मृतांच्या घरी एकच आकांत उसळला. घटनास्थळी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. धाड पोलीसही दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून वाहतूक सुरळीत केली.

# तेली समाजाच्या स्नेहमिलन सोहळ्यात ठाम राजकीय निर्धार

## समाजातील उमेदवारांना एकमुखी पाठिंबा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती** अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तेली समाजाने आपली राजकीय भूमिका स्पष्ट करत पक्षभेद न ठेवता समाजातील उमेदवारांना ताकद देऊन निवडून आणण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत श्री संताजी समाज विकास संस्था, अमरावती यांच्या वतीने नववर्षानिमित्त संताजी नगर येथील श्री संताजी भवन येथे आयोजित स्नेहमिलन सोहळ्यात हा एकमुखी ठराव मंजूर करण्यात आला.या सोहळ्यात समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संघटन बळकट करण्यावर भर देण्यात आला. आगामी महानगरपालिका निवडणुकीत विविध पक्षांतर्फे रिंगणात असलेल्या तेली समाजातील उमेदवारांना प्रभागनिहाय पक्ष न पाहता पाठिंबा देण्याचे आवाहन मान्यवरांनी केले. ज्या समाजाचे सत्तेत प्रतिनिधित्व अधिक, त्या समाजाचा विकास वेगाने होतो, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.संस्थेचे अध्यक्ष प्रा. संजय आसोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात माजी मंत्री जगदीश गुप्ता, उद्योजक कैलास गिरोळकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात प्रा. आसोले यांनी समाजातील मतभेद व गटबाजीवर भाष्य करत एकजुटीशिवाय प्रगती शक्य नसल्याचे स्पष्ट केले. प्रमुख अतिथी कैलास गिरोळकर यांनी युवा नेतृत्वाने पुढे येऊन समाजाच्या राजकीय व सामाजिक विकासासाठी सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन केले.कार्यक्रमात विविध पक्षांतून निवडणूक लढविणाऱ्या समाजातील उमेदवारांनी परिचय करून देत सहकार्याची मागणी केली. मतभेद विसरून समाजहितासाठी एकत्र येण्याचा निर्धार करत स्नेहभोजनाने या सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# दुचाकी चोरायचा, फिरवायचा अन् सोडून द्यायचा; १२ दुचाकी जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती** शहर गुन्हे शाखेच्या पथकाने सोमवारी एका अट्टल दुचाकी चोरट्याला अटक केली आहे. त्याच्याकडून तब्बल बारा दुचाकी पोलिसांनी एकाच दिवसात जप्त केल्या आहेत. विशेष म्हणजे या बारा दुचाकी चोरट्याने शहरातील विवीध भागात बेवारस सोडून दिल्या होत्या. काही दुचाकी कुठे सोडल्यात हे त्या चोरट्यालासुध्दा आठवत नव्हते. मात्र गुन्हे शाखेच्या पथकाने बारा तासात बारा दुचाकी शोधून काढल्या आहेत. हा चोरटा चोरी केलेल्या दुचाकी विकत नव्हता तर फिरवायचा आणि सोडून द्यायचा. निरंजन पंजाबराव कळसकर (३५ रा. भटवाडी, अमरावती) असे पोलिसांनी अटक केलेल्या चोरट्याचे नाव आहे. निरंजन कळसकर हा गवंडीकाम करतो. मात्र दुचाकी चोरीकरण्यात तो अंत्यत पटाईत आहे. यादुचाकी त्याने मागील केवळ महिना तेदिड महिन्याच्या कालावधीत शहरातीलविवीध भागातून चोरल्या आहेत.यातील एक दुचाकी त्याने बहिरमवरूनसुध्दा चोरलेली आहेत. निरंजन कळसकरने एक दुचाकी श्याम चौकातील एका मिठाईच्या दुकानासमोरुन चोरली. या दुचाकी चोरीची कोतवाली ठाण्यात नोंद झाली होती. चव्हाण, एपीआय महेश इंगोले व त्यांच्या पथकाने तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांनी सीसीटीव्ही तपासले, त्यावेळी निरंजन कळसकर यानेच ती दुचाकी चोरल्याचे पोलिसांना लक्षात आले या आधारे पोलिसांनी त्याला अटक केली. त्याच्या चौकशीत त्या दुचाकीसह त्याने तब्बल बारादुचाकी चोरल्याचे समोर आले. दुचाकी कुठे विकल्या असे पोलिसांनी त्याला विचारले असता कुठेही नाही, असे त्याचे उत्तर होते. हे ऐकून पोलीसही चक्रावले. पोलिसांनी आरोपी जवळून सर्व दुचाक्या जप्त केल्या आहेत.

# नागपुरात प्रचार धडाका, मुख्यमंत्र्यांच्या तीन सभा,

## सपकाळांचा उमेदवारांशी संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नागपूर :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण तापले असून प्रचाराला वेग आला आहे. प्रमुख पक्षांनी आपापल्या प्रचार रणनिती आखत मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवार, ६ जानेवारी २०२६ रोजी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या महत्त्वपूर्ण घडामोडी नागपुरात घडणार आहेत.भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपुरात तीन जाहीर सभा घेणार आहेत. या सभा शहरातील विविध भागांत आयोजित करण्यात आल्या असून त्यातून महायुतीचा प्रचार अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पहिली सभा सायंकाळी ७ वाजता बोरगाव चौक, दिनशा



आईस्क्रिमजवळ आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर दुसरी सभा रात्री ८ वाजता तिरंगा चौक, सक्करदरा येथे पार पडणार आहे. दिवसाचा शेवट त्रिमूर्ती नगर चौकात रात्री ९ वाजता होणाऱ्या तिसऱ्या जाहीर सभेने होणार आहे.

या सभांमधून मुख्यमंत्री फडणवीस नागपूर महापालिका निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचे आवाहन करणार असून शहराच्या विकाससंदर्भातील मुद्दे मांडण्याची शक्यता आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक वाहतूक आणि स्मार्ट सिटीसारख्या योजनांचा आढावा घेण्यात येणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात येत आहे.

# संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हा परिषदेचा आराखडा; सुमारे ५०० गावांवर टंचाईचे सावट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती :** गतवर्षी जिल्ह्यात निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईचा अनुभव लक्षात घेता यंदाही अमरावती जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने संभाव्य पाणीटंचाई निवारणासाठी नियोजनास सुरुवात केली आहे. पाणीटंचाई आराखड्याच्या तिसऱ्या टप्प्यातील तयारी सध्या सुरू असून, एप्रिल ते जून या उन्हाळी कालावधीत मेळघाटासह चिखलदरा आणि चांदुर रेल्वे तालुक्यातील काही गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.गतवर्षी मेळघाट परिसरासह जिल्ह्यातील इतर तालुक्यांतील सुमारे ४५० गावांमध्ये तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागला होता. यंदा पावसाचे प्रमाण, भूजल पातळीतील घट आणि वाढती पाण्याची गरज लक्षात घेता जवळपास ५०० गावे संभाव्य टंचाईच्या छायेत येण्याची शक्यता असल्याने जिल्हा परिषद प्रशासन सतर्क झाले आहे. पाणीटंचाई आराखड्यानुसार पहिल्या टप्प्यात ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत जिल्ह्यात कुठेही पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली नव्हती. त्यामुळे



पहिला टप्पा सुरळीतपणे संपुष्टात आला आहे.सध्या दुसऱ्या टप्प्यात जानेवारी ते मार्च या कालावधीसाठी संभाव्य पाणीटंचाई निवारणाच्या दृष्टीने नियोजन केले जात आहे. मात्र, एप्रिल ते जून या तिसऱ्या टप्प्यात तापमान वाढ, पाणीसाठ्यांतील घट आणि अनेक गावांतील विहिरी व बोअरवेल आटण्याची शक्यता लक्षात घेता विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांकडून पाणीटंचाईविषयक माहिती मागविण्यात आली असून, त्याआधारे आराखडा अंतिम केला जाणार आहे.दरम्यान, जिल्ह्यातील ग्रामीण भागात सध्या ६०० पेक्षा अधिक हातपंप बंद अथवा नादुरुस्त अवस्थेत आहेत. या हातपंपांची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याचे काम सुरू असून, दुर्गम व आदिवासी भागांपर्यंत पोहोचण्यासाठी नवीन वाहने खरेदी करण्याची प्रक्रियाही युद्धपातळीवर राबविण्यात येत आहे.पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून विविध उपाययोजना प्रस्तावित करण्यात येणार आहेत. यामध्ये टंचाईग्रस्त गावांमध्ये नळयोजनांची विशेष दुरुस्ती, नवीन विहिरी व बोअरवेल घेणे, हातपंपांची दुरुस्ती, खासगी विहिरींचे अधिग्रहण, आवश्यकता भासल्यास टँकरद्वारे किंवा बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा, नवीन पाईपलाईन टाकणे तसेच विहिरींचे खोलीकरण आदी उपायांचा समावेश आहे.

# 'समृद्धी'वर पुन्हा 'बर्निंग ट्रॅव्हल्स'चा थरार! धावत्या बसने घेतला अचानक पेट

## चालकाच्या सतर्कतेमुळे बसमधील सर्व ३६ प्रवासी सुखरूप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६बुलढाणा**

समृद्धी महामार्गवरील सर्वात भीषण अपघात सिंदखेड राजानजिक घडला होता. धावत्या ट्रॅव्हल्सने अचानक पेट घेतल्याने बसमधील २६ प्रवाशांचा जागीच कोळसा झाला होता. सन २०२३ मधील अपघाताची कटू आठवण करून देणारी दुर्घटना मेहकरनाजिकच्या समृद्धी महामार्गावर सोमवारी मध्यरात्रीनंतर घडली. मेहकर तालुक्यातील शिवणी पिसा नजिक झालेल्या या दुर्घटनेत ट्रॅव्हल्स बस अचानक पेटली खरी, मात्र नशीब बलवत्तर म्हणून चालकासह सर्व ३६ प्रवासी सुखरूप बचावले आहे.

या बसचा केवळ सांगाडाच उरला असला तरी या अपघाताने सिंदखेड राजा नजीकच्या भीषण अपघाताच्या कटू स्मृती जागवल्या! घटनास्थळी दाखल झालेल्या नागरिकांच्या जीवाचा थरकाप उडाला. प्राप्त माहितीनुसार आज मंगळवारी उत्तररात्री मुंबई कोरीडोर वर चॅनेल ३००. १ जवळ ही दुर्घटना घडली. बस नागपूर वरून नाशिक कडे जात होती. अचानक आग लागल्याने काही क्षणांतच बसने पेट घेतला. चालकाच्या प्रसंगावधानामुळे बस तात्काळ थांबवण्यात आली आणि आरडाओरड करून सर्व प्रवाशांना खाली उतरवण्यात आले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

बसला आग लागल्याचे लक्षात येताच चालकाने रस्त्याच्या कडेला बस उभी केली. काही मिनिटांतच बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली आणि संपूर्ण बस जळून खाक झाली. सुदैवाने सर्व प्रवासी सुरक्षित बाहेर पडले.


खुराना ट्रॅव्हलची (क्रमांक एम एच ४० सिटी ८०४३(खुराणा ट्रॅव्हल) ही रस्त्याच्या कडेला जळत असल्याचे दिसून आले.ट्रॅव्हलचे चालक वाहिद शेख (वय ३६, रा. नागपूर) याला विचारणा केली असता त्यांनी सांगितले की ट्रॅव्हलच्या वायरिंगमध्ये शॉर्ट सर्किट होऊन अचानक आग लागली. सदर ट्रॅव्हल्स नागपूर येथून नाशिककडे जात होती. वाहनामध्ये एकूण ३६ प्रवासी प्रवास करत होते.आग लागल्याची बाब लक्षात येताच चालक व कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखून सर्व प्रवाशांना तात्काळ सुरक्षितरित्या बाहेर काढले. कोणालाही कोणतीही दुखापत झाली नाही. त्यानंतर घटनास्थळी अग्निशमन दलाचे वाहन बोलावून आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

# नागपूरला तक्रार; दोन कंत्राटदारांचे चार वादग्रस्त रस्ते, चौकशीचा ससेमीरा

## सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांवर गुणवत्ता तपासणीचे गंडांतर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६पथ्रोट**

शासनाच्या विविध शीर्षकांतर्गत गावात दोन कंत्राटदारांकडून करण्यात आलेल्या सिमेंट काँक्रीटच्या चार रस्त्यांच्या गुणवत्तेबाबत नागपूरच्या कार्यालयात तक्रार झाल्याने ते रस्ते वादग्रस्त ठरले आहे. सदर रस्त्यांच्या बाबतीत चौकशींचा ससेमिरा सुरु झाल्याने संपूर्ण गावकऱ्यांचे लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे.



मागील वर्षी नोव्हेंबर, डिसेंबर महिन्याच्या कालावधीत नागरी सुविधा सण २०२५-२६ अंतर्गत ग्रामपंचायत पनोट येथे वार्डक्रमांक तीन मध्ये दोन ठिकाणी, वार्ड क्रमांक चार येथे एक ठिकाणी आणि वार्ड क्रमांक पाच मध्ये एक ठिकाणी सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांचे बांधकाम करण्यात आले आहे. सदरची चारही कामे अंदाजपत्रकानुसार न करता अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात आली आहे. असा आरोप करून तक्रारीचे निराकरण होईपर्यंत कंत्राटदारांना बिल अदा करण्यात येऊ नये. अशा आशयाची तक्रार वार्ड क्रमांक चार मध्ये राहणाऱ्या एका स्थानिक व्यक्तीकडून जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग पंचायत समिती अचलपूर यांच्याकडे करण्यात आली होती.

प्राप्त तक्रारीनंतर सदर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून त्या चारही रस्त्यांची चौकशी व गुणवत्ता तपासणी करण्यात आली होती. परंतु त्यावर तक्रारदाराचे समाधान न झाल्याने त्यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. त्याची गांभीर्याने दखल घेत पंकज वानखडे उपविभागीय अभियंता जि.प. बांधकाम उपविभाग अचलपूर यांनी राज्य गुणवत्ता निरीक्षक श्रेणी २ नागपूर येथील कामांना पंचायत समितीचे यांना पत्राद्वारे ग्रामपंचायत पथ्रोट संबंधित अभियंता यांच्या सोबत कामांची तपासणी करण्यात यावी. जेणेकरून तक्रार करता यांना उपोषणापासून परावृत्त करण्यात येईल अशी विनंती केली आहे.त्या अनुषंगाने गुणवत्ता तपासणी अधिकाऱ्यांच्या चमूने तपासणी केली आहे. पुढे त्यावर आहे. सदर रस्त्यावर प्रत्यक्ष भेट देऊनकाय निर्णय दिला जातो याकडेसर्वांचेच लक्ष लागले आहे. तर दुसरीकडे चौकशीची टीम गावात पोहोचण्याआधीच कारवाईच्या धास्तीने आधीच्या रस्त्यांवर पुन्हा एकदा सिमेंट काँक्रीटचे लेपन करण्याचे कॉन्ट्रॅक्टदाराकडून करण्यात येत आहे.

> सदर तक्रार झालेल्या रस्त्यावरील अद्यापही कोणत्याही प्रकारचे बिल काढले नाही. शुक्रवार रोजी वरिष्ठ स्तरावरून गुणवत्ता तपासणीसाठी आले होते. सदर रस्त्यांचे लोकेशन चेक करून रस्त्याची पाहणी व गुणवत्ता तपासणी केली आहे. आलेल्या अहवालानुसार बिल काढण्यात येईल.
>
> **माधुरी कराळे, कनिष्ठ अभियंता पं. स. अचलपूर**

# शेतातील उभा गहू नांगरला केळीचे खांबही जाळले

## शेतकऱ्याचे सव्वा लाखाचे नुकसान; पोलिसात तक्रार दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अंजनगाव सुर्जी**

येथील खेल बाबूजी येथील शेत शिवारात असलेल्या शंकर सीताराम गुजर यांची आजी मुलती बालाजी गुजर यांच्या नावे असलेल्या दीड एकर शेतात पेरलेल्या गहू पिकावर तोंगळ्या इतक्या आवस्तेत असतांना विरोधकांनी रात्रीतून नागरून मोडून टाकल्याची घटना घडली असून शेतात असलेले केळीचे खांब सुद्धा जाळले याबाबात शंकर गुजर यांनी शनिवारी (ता.०३) ला पोलिसात तक्रार दिली असून विजय मोतीराम दातीर, मुकुंद मोतीराम दातीर व अमोल मोतीराम दातीर सर्व रा. बारगण पुरा यांनी गहू नांगरून माझे एक लाख वीस हजाराचे नुकसान केल्याचा आरोप केला आहे पोलिसांनी तक्रार तपासात घेतली असून तपास सुरु केलाशहरातील पान आटाई येथील शंकर गुजर यांच्या मयत असलेल्या आजी मुलती बाळाजी गुजर यांच्यानावे वडिलोपार्जित सर्वे न ४२/१,अ यात दीड एकर शेती आहे ती शेती शंकर गुजर नियमित वाहत आहेत चालू रब्बी हंगामात त्यांनी शेतात गहू पीक पेरले होते गहू टोंगळ्या पर्यंत वाढला असता आरोपीने रात्रीतून माझ्या शेतात येऊन उभा गहू ट्रॅक्टर ने नांगरून मारून टाकला व शेतातील केळीचे खांब सुद्धा जाळले सकाळी शेतात गेल्यावर हीं अवस्था पाहून शेतकरी शंकर हतबल झाले व त्यांनी पोलीस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली व त्यांच्या शेताचे वारस हक्काचे प्रकरण अप्पर जिल्हाधिकारी अमरावती व उपविभागीय अधीकारी दर्यापूर यांच्याकडे चालू असतांना विजय, मुकुंद व अमोल या दातीर भावडांनी शंकर गुजर यांच्या ताब्यात असलेल्या शेतातील उभ्या गव्हावर रात्रीतून ट्रॅक्टर ने नांगर मारला व शंकर गुजर यांचे एक लाख वीस हजाराचे नुकसान केले असा आरोप करून पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस तपास करत आहेत

त्यांच्या आपसी मलमत्तेचे कारण असल्याच्या प्रकारातून वाद झाला आहे तक्रारीवरून अदखलपात्र गुन्हा नोंद केला असून तपास करून योग्य ती कारवाई करण्यात येईल अशी माहिती सूरज बोंडे पोलीस निरीक्षक अंजनगाव सुर्जी यांनी दिली.

# विदर्भात कडाक्याची थंडी वर्ध्यात ८.४, अमरावती ९.२ वर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

राज्यातील अनेक शहरांमध्ये तापमानात अवघ्या २४ तासात चार ते पाच अंशाने घट झाली आहे. प्रामुख्याने विदर्भात थंडीचा कडाका वाढला असून गोंदिया शहरात या मोसमातील सर्वाधिक कमी म्हणजे सात अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. तर नागपूर शहरात ७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.




राज्यात हवामानात सतत बदल जाणवत असून, काही भागांत कडाक्याची थंडी तर काही ठिकाणी ढगाळ आणि दमट वातावरण असे संमिश्र चित्र सध्या पाहायला मिळत आहे. हिमालयाकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांच्या बदलत्या प्रवाहाचा परिणाम महाराष्ट्रावर होत असून, पुढील २४ तासांत विशेषतः पहाटे आणि रात्रीच्या वेळी थंडीचा कडाका वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**विदर्भात अचानक गारठा**

राज्यात सर्वाधिक थंडीचा फटका विदर्भाला बसला आहे. गोंदियामध्ये किमान तापमान थेट ७ अंश सेल्सिअसपर्यंत घसरले असून, नागपूरमध्ये पारा ७.६ अंशांवर नोंदवला गेला आहे. मागील काही दिवसांच्या तुलनेत ही घट लक्षणीय असून, पहाटेच्या वेळी तीव्र गारठा जाणवत आहे. चंद्रपूर, भंडारा, गडचिरोलीसह इतर विदर्भातील जिल्ह्यांमध्येही थंडीचा प्रभाव वाढताना दिसत आहे. वर्ध्यात ८.४, अमरावती ९.२ तर ब्रम्हपुरी येथे ९.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. उर्वरीत शहरातही किमान तापमानाचा पारा दहा ते १५ अंशाच्या आसपास आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील २४ ते ४८ तासांत राज्यातील थंडीचा कडाका अधिक वाढू शकतो. विशेषतः विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात रात्री व पहाटे तापमान अधिक खाली जाण्याची शक्यता आहे. नागरिकांनी थंडीपासून काळजी घेण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

# नागरिकांनो, पतंग पुन्हा मिळेल; पण आयुष्य नाही

## पतंगोत्सव सुरक्षिततेने साजरा करण्याचे महावितरणचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

मकर संक्रांतीचा सण जवळ येताच आकाशात रंगीबेरंगी पतंगांची रेलचेल सुरू झाली आहे. मात्र, पतंग उडवण्याच्या उत्साहात विजेच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष केल्यास ते जीवावर बेतू शकते, असा गंभीर इशारा महावितरणने दिला आहे. पतंग पुन्हा मिळेल, पण आयुष्य नाही, असे ठामपणे सांगत अमरावती येथील महावितरण मुख्य अभियंता कार्यालयाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.नायलॉन अथवा चिनी मांजा हा पर्यावरणासोबतच मानवी जीवासाठीही अत्यंत घातक आहे. या मांजावर धातूच्या कणांचे आवरण असल्याने तो विजेचा उत्कृष्ट सुवाहक ठरतो. असा मांजा उच्चदाब वीजवाहिन्यांच्या संपर्कात आल्यास मांजा हातात धरलेल्या व्यक्तीला तीव्र विजेचा धक्का बसून गंभीर अपघात किंवा मृत्यूही होऊ शकतो. शहरी भागात वीजवाहिन्यांचे जाळे दाट असल्याने धोका अधिक वाढतो.पतंग वीजतारांमध्ये अडकल्यास तो काढण्यासाठी लोखंडी सळई, ओले बांबू किंवा लाकडी काठ्यांचा वापर करू नये. यामुळे शॉर्ट सर्किट होऊन मोठी दुर्घटना घडू शकते. तसेच डीपी किंवा ट्रान्सफॉर्मरजवळ उभे राहून पतंग उडवू नका. तेथे स्पार्किंग किंवा स्फोट होऊन गंभीर इजा होण्याची शक्यता असते, असे महावितरणने स्पष्ट केले आहे.वीजतारांमध्ये मांजा अडकल्यामुळे ट्रिपिंग होऊन संपूर्ण परिसराचा वीजपुरवठा खंडित होतो. बिघाड दुरुस्त करताना महावितरण कर्मचाऱ्यांच्या जीवालाही धोका निर्माण होतो. त्यामुळे आपला आनंद इतरांसाठी संकट ठरू नये, याची जबाबदारी नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.सुरक्षिततेसाठी मोकळ्या मैदानात किंवा सुरक्षित छतावरच पतंग उडवावा. वीजवाहिन्या, खांब व ट्रान्सफॉर्मरपासून दूर राहावे. केवळ सुती धाग्याचा मांजा वापरावा. पतंग अडकल्यास तो सोडून द्यावा. लहान मुलांवर पालकांनी विशेष लक्ष ठेवावे, असेही महावितरणने नमूद केले आहे.



# महापालिकेची 'एक खिडकी योजना' फेलीवर

## प्रचाराचे सात दिवस शिल्लक असताना 'एनओसी'चे अर्ज प्रलंबित : झोननिहाय व्यवस्था करण्याची उमेदवारांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

निवडणूक प्रचाराच्या अनुषंगाने उमेदवारांना विविध परवानग्या वा 'ना-हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) एकाच ठिकाणाहून देण्याच्या उद्देशाने महापालिकेच्या मुख्य कार्यालयात 'एक खिडकी' योजनेसाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला आहे; मात्र येथे मनुष्यबळ कमी असल्याने अनेक उमेदवारांचे अर्ज प्रलंबित आहे. त्यामुळे उमेदवारांकडून रोष व्यक्त करण्यात येत आहे.

महापालिकेच्या नगररचना विभागात हा कक्ष सुरू करण्यात आला असून, येथे सोमवारी एकाच दिवशी सुमारे १५० पेक्षा अधिक अर्ज आले होते. त्यापैकी अंदाजे ७० उमेदवारांनाच प्रचाराच्या ऑटोसाठी परवानगी मिळू शकली. याशिवाय प्रचार बुथचे उद्घाटन, सभा आदींसाठीच्या परवानगीचे अर्ज अद्याप प्रलंबित आहे. एकीकडे प्रचारासाठी केवळ आठ दिवस शिल्लक असताना, दुसरीकडे दोन ते तीन दिवस अर्ज प्रलंबित राहत असेल, तर निवडणूक झाल्यावर प्रचार करायचा काय, असा सवाल मिलिंद कहाळे सह इतरही कार्यकत्यांनी उपस्थित केला. दरम्यान आयुक्त सौम्या शर्मा यांनी येथे पाहणी करून मनुष्यबळ वाढविण्याचे निर्देश दिले.

# ठाकरे गटाच्या उमेदवाराच्या आईचा आत्महत्येचा प्रयत्न, निवडणुकीच्या रणधुमाळीत खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६सांगली**

महापालिका निवडणुकीदरम्यान एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सांगली येथील शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवाराच्या आईने विष प्राशन करत आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना घडली असून, या घटनेमागे काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीकडून उमेदवारी मागे घेण्यासाठी दबाव टाकण्यात आल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे. मात्र, काँग्रेसकडून हे सर्व आरोप फेटाळण्यात आले आहेत.



ही घटना सांगलीच्या प्रभाग क्रमांक १६ मधील आहे. या प्रभागातून शिवसेना ठाकरे गटाकडून उमर गवंडी हे निवडणूक लढवत आहेत, तर त्यांच्या विरोधात काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचे उमेदवार राजेश नाईक रिंगणात आहेत. शिवसेना ठाकरे गटाचा आरोप आहे की, उमर गवंडी यांनी निवडणूक लढवू नये यासाठी त्यांच्यावर सातत्याने दबाव टाकण्यात येत होता.याच मानसिक तणावातून उमर गवंडी यांच्या आई मुमताज गवंडी यांनी विष प्राशन करत आत्महत्येचा प्रयत्न केला.

ही बाब समजताच त्यांना तातडीने सांगलीच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेनंतर रुग्णालयात शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.दोन्ही गट आमनेसामने आल्याने रुग्णालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना शिवसेना ठाकरे पक्षाच्या उपनेत्या उषाताई जाधव यांनी काँग्रेसवर गंभीर आरोप केले आहेत. तर दुसरीकडे, काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचे उमेदवार राजेश नाईक यांनी हे सर्व आरोप निराधार असल्याचं सांगत, कोणत्याही प्रकारचा दबाव टाकण्यात आलेला नसल्याचं स्पष्ट केलं आहे. दरम्यान, या घटनेमुळे सांगलीतील महापालिका निवडणुकीचं वातावरण चांगलंच तापलं आहे.

# महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमरावती गुन्हे शाखेची धडक कारवाई

## अवैध गावठी दारू अड्डे उद्धवस्त, साडेपाच लाखांचा मुद्देमाल नष्ट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

आगामी अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच अवैध धंद्यांना आळा बसावा यासाठी अमरावती शहर गुन्हे शाखेने अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबवत धडक कारवाई केली आहे. या कारवाईत दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापेमारी करून मोठ्या प्रमाणात दारू व साहित्य जप्त करून नष्ट करण्यात आले आहे.दि. ६ जानेवारी २०२६ रोजी गुन्हे शाखेने पोलीस स्टेशन नांदगाव पेठ हद्दीतील ग्राम शेंदोळा (बु.) येथील पारधी बेड्यावर छापा टाकला. यावेळी दात्या जयप्रकाश भोसले (वय ४०), किरण धरम भोसले व तारामती झगडया भोसले (सर्व रा. शेंदोळा बु.) हे अवैधरित्या गावठी हातभट्टीवर दारू तयार करताना रंगेहात मिळून आले. त्यांच्या ताब्यातून ७५० लिटर मोह माश सळवा, ३५० लिटर गावठी दारू व इतर साहित्य असा एकूण २ लाख ८४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.तसेच पोलीस स्टेशन गाडगे नगर हद्दीतील वलगाव रोडवरील ऑर्किड शाळेच्या मागील नाल्याजवळ छापेमारी करताना राज रामनाथ वाघमारे (वय २५, रा. नवसारी, सिद्धार्थ नगर, अमरावती) हा अवैधरित्या दारू निर्मिती करताना आढळून आला. त्याच्याकडून १२०० लिटर सळवा, २०० लिटर गावठी दारू व साहित्य असा ३ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या दोन्ही कारवायांमध्ये एकूण ५ लाख ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून जागेवरच नष्ट करण्यात आला. संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (क), (फ), (ड) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे व रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात करण्यात आली.




# रील्ससोबतच 'झेंड्या'लाही मान ! मनपा निवडणुकीत पारंपरिक प्रचाराची लाट

## प्रत्यक्ष मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी पारंपरिक प्रचार साहित्याचे महत्त्व वाढले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**



अमरावती महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज छाननी आणि माघार प्रक्रियेनंतर शनिवारी चिन्ह वाटपाची प्रक्रिया पूर्ण झाली. डिजिटल युगात समाजमाध्यमांद्वारे प्रचाराला चालना मिळाली असली, तरी प्रत्यक्ष मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी पारंपरिक प्रचार साहित्याचे महत्त्व आजही कायम आहे. यंदा साहित्यांच्या मागणीत सुमारे ४० ते ५० टक्क्यांनी वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. मफलर, टोप्या, बेंच, हँडे आणि यंदा एलइडी लाईट्सना विशेष मागणी आहे. अपक्ष उमेदवारांची चिन्हें जहीर झाल्यानंतर प्रचार साहित्य विक्री करणाऱ्या दुकानांत मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.आहे. यंदा प्रचार साहित्यांत मफलरने विक्रीत आघाडी घेतली मफलरमध्येही विविध कापडांचे प्रकार उपलब्ध असून, रोटो कापडातील मफलर प्रति नग ५ रुपये, सेंटिन कापडातील १२ रुपये, ऊलन कापडातील १०० रुपये, तर उमेदवारांसाठी खास कापडातील मफलर १५० रुपये प्रति नग व्हीआयपी दराने विकले जात आहेत. नागरिकांसाठी सेंटिन, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांसाठी वुलन आणि उमेदवारांसाठी व्हीआयपी मफलर खरेदी केल्या जात असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले

अपक्ष उमेदवारांची चिन्हे जाहीर झाल्यानंतर त्यानुसार ऑर्डर दिल्या जात आहेत. एक ते दोन दिवसांत साहित्य तयार करून सांगितले. मात्र, पक्षीय प्रचार साहित्य दिले जात असल्याचे दुकानदारांनी आधीच तयार आहे.

**५० टक्के किंमती वाढल्या**

साधारणतः ५० टक्के साहित्याच्या किमतींत वाढ झाली आहे. मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी पारंपरिक प्रचार साहित्याचे महत्व कायम आहे. विशेषता अपक्ष उमेदवारांसाठी रील्स हे स्वताची ओळख निर्माण करण्याचे महत्वाचे व्यासपीठ ठरत आहे. वाढत्या महागाईचा फटका साहित्याला बसला आहे.

**उमेदवारांचा डिजिटल प्रचाराला वेग**

पारंपरिक प्रचारासोबतच उमेदवारांचा सोशल मीडियावरील रील्सवर विशेष भर वाढताना दिसत आहे. घरोघरी भेटी, पोस्टर आणि मफलर यासोबतच आता १५ ते ३० सेकंदांच्या रील्समधून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू आहे.विकासकामांचे व्हिडिओ, जनतेशी संवाद, घोषवाक्ये आणि आकर्षक संगीताच्या साथीने तयार होणाऱ्या रील्समुळे तरुण मतदारांत उमेदवारांची ओळख वाढत आहे. कमी खर्चात मोठ्या प्रमाणात पोहोच मिळत असल्याने अनेक उमेदवार रील्सना प्रचाराचे प्रभावी माध्यम मानत आहेत.

# अमरावती श्रमिक पत्रकारसंघाच्या पुरस्काराचे मानकरी..




अमरावती श्रमिक पत्रकार संघाद्वारे पुरस्कार प्राप्त पत्रकार दैनिक विदर्भ मतदारच्या पत्रकार योगिनीताई अर्डक, द हितवादचे जिल्हा प्रतिनिधी प्रवीण कपिले, दैनिक लोकमतचे पत्रकार प्रदीप भाकरे, टीव्ही ९ चे पत्रकार स्वप्निल उमप यांचे दैनिक विदर्भ प्रजासत्ताक कडून मनःपूर्वक अभिनंदन!!

# नऊ वर्षे कुठे होता?, मतदारांच्या प्रश्नाने बहुतांश उमेदवार अनुत्तरीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

अर्ज माघारीनंतर रिंगणातअसलेल्या ४५१ उमेदवारांनी आपल्या प्रचारास जोमाने सुरुवात केली आहे. यात प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात अनेकांना मतदारांच्या रोषाला सामोरे जावे लागल्याचे दिसून आले. आतापर्यंत पाणीटंचाई, अनधिकृत फेरीवाले, सार्वजनिक वाहतुकीचे वाजलेले तीनतेरा यामुळे त्रस्त झालेल्या मतदारांनी मते मागायला येणाऱ्या उमेदवारांसह त्यांच्या कार्यकर्त्यांना प्रश्न विचारून भंडावून सोडल्याची चित्र पाहायला मिळत आहे.सन २०१७ मध्ये मनपा निवडणूक झाली होती. गतनिवडणुकीत निवडून आल्यानंतर अनेक उमेदवारांनी प्रभागासह मतदारांकडे पाठ फिरवली होती. स्थानिक प्रश्न, नागरिकांशी संवाद हे नऊ वर्षात दुय्यम ठरले. या काळात माजी नगरसेवकांचे पालिकेशी संबंध हे बहुतांशी कंत्राटे, शिफारशीपुरतेच मर्यादित राहिल्याचे दिसले.

**प्रस्थापित पुन्हा सक्रिय**

आता निवडणुकीची चाहूल लागताच वर्षभरापासून हेच प्रस्थापित पुन्हा सक्रिय झाले होते. नऊ वर्षात मतदारांशी फटकून वागणारे अनेक चेहरे आता मत मागताना अचानक अदबीने, प्रेमाने आणि आपुलकीने संवाद साधताना दिसत आहेत. हात जोडणे, आठवणी काढणे, विकासाची आश्वासने देणे, हे सारे दृश्य मतदारांनी याआधीही पाहिलेले आहे.

**अमृतचे अमृत पोहोचलेच नाही**

शहरात अनधिकृत बांधकामांचा वेग प्रचंड वाढला. प्रभागनिहाय पाहणी केली असता निवासी, व्यावसायिक तसेच मिश्र वापराच्या इमारती नियम धाब्यावर बसवून उभ्या राहिल्याचे चित्र आहे. फेरीवाल्यांचे अतिक्रमण वाढले आहे. नऊ वर्षांच्या प्रशासकीय काळात महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून अमृत पाणीपुरवठा अद्यापही अनेक वॉर्डात पोहोचलेच नाही. योजना आणली. मात्र अमृतचे अमृत निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या माजी नगरसेवकांनी या सर्व मुद्यांना सोयिस्करीत्या बगल दिली. तरुण आणि सुजाण मतदारांना हा प्रश्नसुद्धा सतावताना दिसत आहे. एकंदरीत राजकीय वातावरण तापले आहे.

# अकोल्यात धारदार शस्त्राने काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यावर जीवघेणा हल्ला

## नेत्यावर हल्ला झाल्याने परिसरात खळबळ




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अकोला**


राज्यात महापालिका निवडणुकींचा रणसंग्राम पाहायला मिळत आहे. या निवडणुकीत काही ठिकाणी वादाचे फटाके देखील फुटले आहेत. सोलापूरमध्ये काही दिवसांपूर्वी मनसेच्या विद्यार्थी सेनेच्या पदाधिकाऱ्याची हत्या झाल्याची घटना घडली. सोलापूरमधील मनसेच्या पदाधिकाऱ्याच्या हत्येची घटना ताजी असताना अकोल्यात मंगळवारी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यावर धारदार शस्त्राने हल्ला झाल्याची घटना घडली आहे. या हल्ल्याने अकोल्यात खळबळ उडाली आहे.

अकोल्यातील काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यावर जीवघेणा हल्ला झाला आहे. काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आणि अकोल्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हिदायत पटेल यांच्यावर हा जीवघेणा हल्ला झालाय. अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातल्या मोहाळा गावात त्यांच्यावर मंगळवारी जीवघेणा हल्ला झाला. हिदायत पटेल यांच्यावरील हल्ल्याचं कारण अद्याप अस्पष्ट आहे.हिदायत पटेल २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार होते. हिदायत पटेल सध्या काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आहेत. गावातील राजकीय संघर्षातून मतीन पटेल गटाने हिदायत पटेल यांच्यावर चाकू हल्ला केल्याची प्राथमिक माहिती हाती आली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी असलेल्या हिदायत पटेल यांना अकोटमधील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, पुढील उपचारासाठी अकोल्याला पाठवण्यात आले आहेत.तत्पूर्वी, नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत हिदायत पटेल यांनी काँग्रेस पक्षाच्या विरोधात भूमिका घेतल्याचा अकोट नगरपालिकेतील काँग्रेसच्या नगराध्यक्ष उमेदवार अलका बोडके यांनी आरोप केला होता. हल्ल्याचं नेमकं कारण अद्याप अस्पष्ट असलं तरी पोलिसांचा तपास सुरू आहे.

# प्रभागात तीनच मत दिले तर चौथे बाद होणार का?

## एका प्रभागात चार वेळा मतदान करावे लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**



महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या चार वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी सदस्यीय प्रभाग रचना लागू असल्याने प्रत्येक मतदाराला संबंधित प्रभागातील अ, ब, क आणि ड अशा चारही जागांसाठी मतदान करणे बंधनकारक आहे. केवळ एक किंवा दोन जागांवर मतदान करून चालणार नाही, असे निवडणूक प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर किमान दोन आणि कमाल चार ईव्हीएम मशीन उपलब्ध असतील. उमेदवारांच्या संख्येनुसार या चारही जागांचे मतदान वेगवेगळ्या किंवा दोन ईव्हीएम मशीनवर विभागले जाऊ शकते. मतदारांनी चारही जागांसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच मतदान वैध ठरणार आहे.

**एका प्रभागात चार वेळा मतदान करावे लागणार**

ईव्हीएम मशीनवर प्रत्येक प्रभागातील उमेदवारांची नावे अ, ब, क, आणि ड अशा चार गटांत विभागलेली असतील. मतदाराला प्रत्येक गटातील एका उमेदवाराला, असे एकूण चार वेळा जिथे तीनच नगरसेवक निवडणू द्यायचे आहे तिथे तिनदा मतदान करावे लागेल.

**मतदान वैध व अवैध कसे ठरणार ?**

ईव्हीएम मशीनमुळे मतदान अवैध होण्याचे प्रमाण नगण्य आहे. तथापि, जर मतदाराने विहित पद्धतीने चारही मते नोंदवली आणि कंट्रोल युनिटमधून 'बीप' आवाज आला, तरच ते मतदान वैध मानले जाईल.

**तीनच उमेदवारांना मत द्यायचे असेल तर...**

जर एखाद्या मतदाराला केवळ तीनच उमेदवारांना मतदान करायचे असेल आणि चौथ्या गटातील कोणालाही मत द्यायचे नसेल, तर त्याला त्या चौथ्या गटातील 'नोटा' या पर्यायाचे बटण दाबावे लागेल. पसंतीचा उमेदवार नसेल तर 'नोटा' हाच एकमेव पर्याय आहे.

**चौथ्या मताचे काय होणार?**

मतदाराने चार पैकी एखादे मत दिले नाही, तर ईव्हीएम मशीनमधून 'बीप' आवाज येणार नाही आणि मतदान पूर्ण झाल्याची पावती (VVPAT) मिळणार नाही. त्यामुळे प्रत्येक गटासाठी मत नोंदवणे अनिवार्य आहे. जर तुम्हाला चौथ्या उमेदवाराला मत द्यायचे नसेल, तर से मत 'नोटा'ला देणे आवश्यक ठरते.

**'नोटा'साठी किती वेळा दाबायचे ?**

प्रत्येक प्रभाग गटासाठी (अ, ब, क, ड) स्वतंत्र नोटा पर्याय उपलब्ध असेल. जर तुम्हाला कोणत्याही उमेदवाराला मत द्यायचे नसेल, तर तुम्हाला प्रत्येक गटासाठी एकदा याप्रमाणे चार वेळा नोटाचे बटण दाबावे लागेल.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा 8605948853

# एसटी बस बंद पडल्यास प्रवाशांना तातडीने पर्यायी बसमध्ये विनाशुल्क प्रवास

## भाडे फरकाच्या नावाखाली प्रवाशांकडून पैसे मागितल्यास संबंधित वाहक व चालकावर कठोर कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

प्रवासादरम्यान एसटी बस अचानक नादुरुस्त होऊन बंद पडल्यास प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागू नये, यासाठी राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी महत्त्वाचे आदेश दिले आहेत. एखादी एसटी बस बंद पडल्यास मागून येणाऱ्या कोणत्याही एसटी बसमध्ये प्रवाशांना विनाशुल्क व तातडीने प्रवासाची सुविधा देणे बंधनकारक राहणार आहे. शिवशाही, ई-शिवाई, शिवनेरी यांसारख्या प्रीमियम बसेसमध्येही प्रवेश नाकारता येणार नाही. तसेच भाडे फरकाच्या नावाखाली प्रवाशांकडून पैसे मागितल्यास संबंधित वाहक व चालकावर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.सर्वसामान्य प्रवाशांचा एसटी बसवर मोठ्या प्रमाणात विश्वास आहे. मात्र, अलीकडच्या काळात आगारांना अपेक्षित संख्येने नवीन बसेस उपलब्ध न झाल्याने जुन्याच बसेसवर अधिक भार पडत आहे. परिणामी, प्रवासादरम्यान बस नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढले आहे. बस बंद पडल्यास प्रवाशांना होणारा मनस्ताप लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.परिवहनमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशानुसार, बस बंद पडल्यास प्रवाशांनी वाहकाकडून तिकीट प्रमाणित करून घ्यावे. त्यानंतर मागून येणाऱ्या कोणत्याही तीन एसटी बसेस थांबवण्याचा अधिकार प्रवाशांना राहणार आहे. मूळ प्रवासाचे वैध तिकीट असल्यास प्रवाशांना कोणत्याही श्रेणीच्या बसमध्ये कोणतेही अतिरिक्त पैसे न देता प्रवास करता येणार आहे.अनेकदा साधी बस बंद पडल्यानंतर मागून येणाऱ्या वातानुकूलित किंवा प्रीमियम बसमधील वाहक-चालक प्रवाशांना प्रवेश नाकारतात किंवा भाड्याच्या फरकाची मागणी करतात, अशा तक्रारींची गंभीर दखल घेण्यात आली आहे. यापुढे अशा प्रकारची अडवणूक झाल्यास प्रवासी जवळच्या आगारप्रमुखांकडे किंवा एसटीच्या हेल्पलाइन क्रमांकावर तक्रार करू शकतात.प्रवाशांच्या सोयीसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा इशाराही परिवहनमंत्र्यांनी दिला आहे.



# अमरावती एमआयडीसीमध्ये केमिकल फॅक्टरीला भीषण आग

## महिला कर्मचाऱ्यांचा जळून मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

अमरावती येथील बडनेरा रोडवरील एमआयडीसी परिसरात असलेल्या गोपी इंडस्ट्री या केमिकल (थिनर) कंपनीत आज सकाळी भीषण स्फोट (ब्लास्ट) होऊन मोठी आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या आगीत कंपनीत काम करणाऱ्या एका महिला कर्मचाऱ्याचा जळून मृत्यू झाला असून, आणखी एक महिला गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.आज सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास गोपी इंडस्ट्रीमध्ये अचानक ब्लास्ट झाला.



स्फोटानंतर काही क्षणांतच आगीने उग्र रूप धारण केले. कंपनीत त्या वेळी सात महिला कर्मचारी काम करत होत्या. आगीचा वेग इतका प्रचंड होता की, एका कर्मचाऱ्याला बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही.या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या महिलेचे नाव सोनाली सुनील कोडापे (वय २९) असे आहे. त्या वर्धा जिल्ह्यातील रहिवासी असून, फक्त आठवडाभरापूर्वीच या कंपनीत नोकरीला रुजू झाल्या होत्या. अचानक घडलेल्या या घटनेने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. दीर्घ प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. मात्र, तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते.प्राथमिक माहितीनुसार, कंपनीच्या हलगर्जीपणामुळे ही आग लागल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. केमिकल हाताळणीसाठी आवश्यक असलेले सुरक्षा उपाय अपुरे असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. पोलीस व औद्योगिक सुरक्षा विभागाकडून चौकशी सुरू असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.या प्रकरणी एमआयडीसी प्रशासन, पोलीस व कामगार विभाग संयुक्तपणे तपास करत आहेत. स्फोटाचे नेमके कारण, सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाले का, याबाबत लवकरच स्पष्टता येण्याची शक्यता आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत